रामकृष्ण परमहंस

निसर्गदत्त महाराज

स्वामी स्वरूपानंद

बीडकर महाराज

टेंबे स्वामी

स्वामी निरंजन रघुनाथ

॥ संतबोध ॥

भाग-३

डॉ. सुहास पेठे

समर्थ रामदास स्वामी

गुरुदेव रानडे

नाना महाराज तराणेकर

कलावती आई

रणछोडदासजी महाराज

गणोरे बाबा

विश्वनाथ महाराज

संतबोध

भाग : ३

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* संतबोध :- ३

पुस्तकरूपाने प्रकाशित पाचवी आवृत्ती : एप्रिल, २०१७
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

♣ संतांची आरती ♣

गाऊ संतांची आरती । देव जागा करिती चित्ती ।।धृ।।

निर्गुण दुर्लभ देव झाला । त्यांनी सगुणात आणिला ।।१।।
स्वार्थी जीव जो गुंतला । त्याला परमार्थी लाविला।।२।।गाऊ..

खोटा कर्ता जो तो झाला । कोण कर्ता तो दाविला ।।३।।
प्रारब्धाची पुसली रेखा । यत्न देव हा ओळखा ।।४।।गाऊ..

मिथ्या अशुद्ध देव गेले । शुद्ध देवांसी स्थापिले ।।५।।
सद्गुण स्वप्नीचे वाटले । त्यांनी जगुनीया दाविले ।।६।।गाऊ..

लोकांसम हे जगती आले । मात्र मृत्यू पुसुनी गेले ।।७।।
सूक्ष्म रूपात राहिले । प्रमाण आजहि देती भले ।।८।।गाऊ..

अपार बुद्धीचे सागर । केला सूक्ष्माचा व्यवहार ।।९।।
सोने मातीत दाखविती । मीपण सरता हाती देती।।१०।।गाऊ..

पैसा भपका केला दूर । साधेपणावरी भर ।।११।।
प्रेम नि:स्वार्थाचे भजन । अवघे त्यागाचे जीवन ।।१२।।गाऊ..

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।१३।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।१४।।गाऊ..

।। सब संतन की जय ।।

संतबोध - भाग : ३

* अनुक्रम *

		पृष्ठक्रमांक
१.	स्नान घातल्यावर हत्तीला थोडा वेळ तरी हत्तीखान्यात बांधून ठेवा.. - पूज्य रामकृष्ण परमहंस	....७
२.	लहान वयातच मन देवाच्या ठिकाणी लावावे. - पूज्य कलावती आई	...११
३.	सत्यवचन ही कलियुगातली तपश्चर्या होय. - पूज्य रामकृष्ण परमहंस	...१६
४.	देह गेला की कर्मभूमी अंतरली..! - श्री रामानंद बीडकर महाराज	...२२
५.	सत्पुरुषसान्निध्यच तारक होय. मग त्यांनी उपदेश निराळा काय करायचा ? - पूज्य टेंबे स्वामी	...२६
६.	...हे खरे अन्नदान । - पूज्य नानामहाराज तराणेकर	...३०
७.	ज्याची देहावरी सत्ता । तोच जाणे भगवंता ।। - श्री विश्वनाथ महाराज	...३४

८. देवाच्या विद्यापीठात जन्मभर विद्यार्थी
म्हणून राहावे लागते.
- पूज्य गुरुदेव रानडे ...३८

९. निर्गुण नेले संदेहाने । सगुण नेले ब्रह्मज्ञाने ।
दोन्हीकडे अभिमाने । वोस केले ।।
- श्री समर्थ रामदास स्वामी ...४३

१०. सर्वथा संयमी जीवन । तयासी नाव धर्माचरण ।।
- स्वामी स्वरूपानन्द ...४९

११. दैनिक इच्छांपलीकडे वाढ होणे
हे पूर्वायुष्यात घडले पाहिजे.
- श्री निसर्गदत्त महाराज ...५४

१२. दर वर्षी वाढदिवसाला एक एक अवगुण सोडून
देत जा आणि एक एक सद्‌गुण वाढवीत जा.
असे केल्यास देवळात जावयास नको.
- पूज्य श्री गणोरे बाबा ...५८

१३. 'बना' ठेवि रे धैर्य सर्व बघ धीराने होई ।
माळी शिंपित बाग उचित ऋतु येता फळ येई ।।
- श्री रणछोडदासजी महाराज ...६३

१४. तेचि भक्ती खरी । देव अंतरी बाहेरी ।।
- स्वामी निरंजन रघुनाथ ...६८

१५. गुरूंचा संतोष ही खरी पूजा.
- श्री रामानंद बीडकर महाराज ...७२

**

संतवचनांचं अथांग दालन..

या युगातील मोठा, दृश्य, सार्वत्रिक चमत्कार म्हणजे संत होत. आपल्यासारख्याच जन्माला आलेल्या, आपल्यासारख्या वातावरणात राहूनही देवपदाला पोचलेल्या, तसंच इतरांनाही हे पद प्राप्त व्हावं, निदान त्यांच्या जीवनातलं दु:खं, चिंता, विवंचना हे थोडं तरी हलकं व्हावं म्हणून निरलसतेनं आपलं आयुष्य वेचणाऱ्या या व्यक्ती म्हणजे सगुण अवतारच होत. ते देहानं गेले तरी सूक्ष्मरूपानं अनंत काळपर्यंत ईश्वरी इच्छेनुसार श्रद्धावंतांसाठी असंच कार्य करीत असतात.

अशा संतांनी माणसावर ठेवलेल्या अनेक ऋणांपैकी एक ऋण त्यांच्या वचनांचं. हे संतवचनांचं दालन अथांग आहे. त्यांतून मिळणारा बोध हा संतांना स्वत:ला झालेला व त्यांनी आचरलेला असल्यानं तो आपल्याला घेण्यासारखा आहे. ज्या असंख्य वचनांनी इतरांप्रमाणंच मलाही आजवर प्रेरणा दिली, प्रसंग –व्यक्ती –विचार यांकडे बघण्याची विधायक, अनेकदा पूर्ण नवीन दृष्टी दिली, त्यांचा कोणास उपयोग होत असल्यास व्हावा या हेतूनं ही संकलनं प्रसिद्ध होत आहेत.

या वचनांच्या मला वाटलेल्या उपयोगाची दिशा समोर यावी यासाठी वचनांचं थोडक्यात निरूपण दिलेलं आहे. संतवचनं अर्थगर्भ व शाश्वत असल्यानं वाचक आपापल्या जीवनाच्या ठेवणी व गरजांनुसार अधिक अर्थ घेऊ शकतीलच. संतांचं, संतवचनांचं व ती मुळात उपलब्ध करून देणाऱ्या प्रकाशकांचं ऋण न फिटणारं आहे. संतबोधाच्या आधीच्या दोन भागांच्या नव्या आवृत्त्या अधिक वचनांची भर घालून या नव्या आकारात पूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेतच.

संतछायेच्या प्रकाशन प्रकल्पाला नेहमीप्रमाणं साहाय्य करणाऱ्या साधकांचा तसंच पुस्तक आकाराला येण्यात मदत करणाऱ्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

संतछाया
संतनगरी, सातारा

– सुहास पेठे

१.

स्नान घातल्यावर हत्तीला थोडा वेळ तरी हत्तीखान्यात बांधून ठेवा..

- पूज्य रामकृष्ण परमहंस

थोडीफार देवभक्तीची किंवा उपासनेची आवड असणाऱ्या व्यक्ती स्वत: किंवा समान आवडीच्या समूहानं एकत्र येऊन अनेक चांगले सात्त्विक उपक्रम करतात. विशेषत: त्यांनी लक्षात घ्यावा असा हा एक साधा व परिणामकारक दृष्टान्त पू. रामकृष्ण देतात. अशा स्वरूपाचे जे उपक्रम होतात त्यांची एकदोन चित्रं आपण पाहू.

एखाद्या ठिकाणी काही माणसं एकत्र येऊन नामजपाला बसतात. कधी एक तास, कधी तीन तास, कधी दिवसदिवससुद्धा. जप एक तासाभराचा असो किंवा तीन तासांचा असो, त्याची वेळ संपली की, माणसं जी जागा सोडून उठतात, ती आधी ज्यांना तिथं भेटायचं आणि काही निरोप द्यायचा होता, काही कामं सांगायची होती ती माणसं कुठं बसली आहेत ते हुडकून त्यांच्या दिशेनं जातात. त्यांना बाजूला घेऊन आपापली कामं सुरू करतात. नसेल तर इतर काही माणसं हा नामजप संपला की शेजाऱ्याला ख्यालीखुशाली सांगणं-विचारणं, अमकातमका भेटला का, अमके बरेच दिवसांत दिसले नाहीत - अशा असंख्य विषयांवर बोलणं लगेच सुरू करतात.

यांत स्त्रीपुरुष, लहानमोठे असा काही भेद वगैरे नसतो.नामजप

संपताच सर्वांच्याच गप्पा उत्साहानं सुरू होतात. त्या काही नाईलाजापोटी असतात म्हणाव्या तर तसं फार क्वचितच असतं. जप संपताच सांगण्यासारखी एखादी दुर्दैवी घटना, अपघात, अकाली मृत्यू - असलं यांत नसतं. या गप्पांत आज जपाला येताना नेसलेली साडी नवीन घडी मोडली का इथंपासून अमका प्रमोट झाला का-यापर्यंत अनेक विषय सुरू झालेले आपल्याला दिसतील.

हे काही एखाद्या मौनजपात, नामजपातच घडतं असं खचितच नाही. ते एखाद्या आरतीमंडळातल्या चांगल्या धार्मिक वातावरणातल्या शेवटच्या जयजयकारानंतरच्या पवित्र वातावरणात प्रसादवाटपाच्या वेळीच सुरू होतं, एखाद्या भजनीमंडळात भगवंताला 'हेचि दान देगा देवा' म्हटल्यानंतर होऊ शकतं, एकतान करणाऱ्या उद्‌बोधक पारमार्थिक उत्तम निरूपणानंतर होऊ शकतं, मंदिरात शांत-प्रसन्नपणे घेतलेल्या देवदर्शनानंतर होतं, योगवर्गानंतर होतं, उत्तम भगवत्संकीर्तनानंतर आरतीची थाळी फिरली नि टेकली की होतं, इतकंच काय घरात साधी, अगदी व्यक्तिगत पूजाअर्चा संपल्यावरसुद्धा दुसऱ्या मिनिटाला होतं.

त्यातही हे केवळ एवढंच निरुपद्रवी गप्पाष्टक चौकशा, वृत्तपत्रांतल्या बातम्या, जाहिराती, दूरदर्शन मालिका, चौकातल्या घटना अशा किंवा एवढ्या विषयांवर मर्यादित असतं, असंही नाही. ते अनेकदा एकमेकांचे मत्सर, गैरसमज, हेवेदावे वाढवणारं, रागद्वेषाला वाट मोकळी करून देणारं - असंही बऱ्याच प्रकारांनी मनाची हानी घडवणारं असतं. त्याचे सादपडसाद पुढं दिवसभर मनातच नव्हे तर माणसांच्या संबंधातसुद्धा विघातकपणे उमटत राहातात. म्हणूनच त्याचा विचार करण्याची गरज आणि त्याबाबतीत बाळगायची सावधानता पूज्य रामकृष्ण या दृष्टान्ताच्या रूपानं आपल्यासमोर ठेवीत आहेत.

वास्तविक आपण स्वत:सुद्धा विचार केला, तर आपल्या लक्षात येऊ शकेल की, आपण एक तासभर जे काही साधन केलं, सत्संगात वेळ घालवला तो कशासाठी की मन मलिन आहे, अशुद्ध आहे, सततच्या विकारांच्या आणि प्रापंचिक भावांच्या, व्यवहारांच्या हालचालींनी ते गढूळ होतं आहे, अशांत होतं आहे - ते दूर व्हावं, शांत व्हावं म्हणून! मग ते साधन वर म्हटल्याप्रमाणं कुठलंही असो. मग त्या त्या साधनानं मिळणारी शांतता, स्थैर्य असे विधायक, सात्त्विक परिणाम जपण्याचा कटाक्ष आपणच नको का बाळगायला?

याउलट बेसावधपणामुळं किंवा हे माहीत नसल्यानं म्हणा, असे सात्त्विक उपक्रम झाल्यावर जर आपण याच मनाला पुन्हा त्याच अशांत विषयांकडं घेऊन गेलो, तर आपण मिळवलेलं जायला किती वेळ लागेल? किंबहुना असं म्हणता येईल की, जपाला किंवा ध्यानाला बसल्यावर लक्ष लागायला कदाचित वीस मिनिटं लागतील, पण पुन्हा मनाच्या संपर्कात आलं तर मिळवलेलं घालवायला तीन मिनिटंसुद्धा लागणार नाहीत.

याच संदर्भात उदाहरण देताना श्री रामकृष्ण परमहंस म्हणतात की, हत्तीची सवय स्वत:वर धूळ अन् माती उडवून घेण्याची आहे. तो ते काम नेहमीच करीत असतो. असं करून तो जेव्हा सर्व अंग धुळीनं माखून घेतो, तेव्हा माहूत त्याला स्वच्छ करण्यासाठी स्नानाला नेतो. ते स्नान झाल्यावर हत्ती स्वच्छ, पवित्र होतो खरा पण त्याला आंघोळीनंतर तसाच मोकळा सोडला तर लगेच तो पुन्हा ओल्या अंगावरच धूळ उडवून घ्यायला सुरुवात करतो आणि आपण घेतलेली एवढी मोठी, कष्टाची, स्नानाची मेहनत धुळीला मिळवतो. म्हणून स्नानानंतर त्याला थोडा काळ तरी हत्तीखान्यात बांधून ठेवणं योग्य समजतात.

साधनेनंतर आपल्या मनाच्या बाबतीत असं घडत असल्याचं आपल्या लक्षात येईल. साधनेनंतर असं चटकन प्रपंचात जाणं म्हणजे आपण एवढ्या कष्टानं घेतलेली आणि परमेश्वराच्या-सद्‌गुरूंच्या कृपेनं आपल्याला मिळालेल्या सत्संगाची मेहनत धुळीला मिळण्यासारखंच आहे. म्हणून मनाचा स्वभाव लक्षात घेऊन नामानंतर, भजनानंतर, दर्शनानंतर, प्रवचनानंतर काही काळ तरी शांत राहाणं, संपर्क टाळणं, मौन पाळणं याची किती गरज आहे, ते स्पष्ट होऊ शकेल. असं झालं तर मग अशा सत्संगामुळं मनाचा विकारीपणा, चंचलपणा, अविवेकीपणा कमी व्हायला मदत होईल. अशा सात्त्विक उपक्रमांचा खऱ्या प्रगतीसाठी उपयोग होईल.

हे करताना व्यवहार्य पद्धतीनं करणं, गैरसमज होऊ नयेत यासाठी सर्वांनी मिळून आधीच ठरवून करणं, अशा उपक्रमानंतर समूहानं विसर्जित होणं, मूळ साधनेला अनुकूल असा लिखित जप करणं, प्रवचनांची टिपणं काढणं, दर्शनं घेणं, देवाला प्रदक्षिणा घालणं अशा अनेक पूरक सात्त्विक कृतींत राहाणं - असे अनेक पर्याय या कामी उपलब्ध असू शकतील.

पण एखाद्या पारमार्थिक उपक्रमाचा आपल्यावरचा साधनेचा खरा परिणाम टिकवण्यासाठी आणि विशेषत: आपली खरी व पूर्ण प्रगती घडवू इच्छिणाऱ्यांसाठीही पूज्य ठाकुरजींनी सांगितलेला मुद्दा मोलाचा आहे, हे खचित.

*

२.

लहान वयातच मन देवाच्या ठिकाणी लावावे..

- पूज्य कलावती आई

अनेक माणसांच्या देवाधर्माचं करण्याच्या कल्पना असतात. त्यानुसार सर्वसाधारण समजूत अशी आढळते की, म्हातारपण आलं की काय 'देवदेव' करायचा तो करावा ! प्रौढपणी, तरुणपणी करायच्या या गोष्टी नव्हेत. लहानपणी तर अजिबातच नव्हेत. या साधारण प्रचलित असलेल्या समजुतीच्या पार्श्वभूमीवर पूज्य कलावती आईंचं हे वचन अभ्यासण्यासारखं आहे. त्यांच्या अनुभवसिद्ध, साक्षात्कारी व अधिकारवाणीच्या मतानुसार 'मन देवाच्या ठिकाणी लावायला लहान वय हे सर्वांत अधिक योग्य वय' होय. प्रचलित मतापेक्षा हे वेगळं वाटलं तरी ते समजून घेणं गरजेचं आहे, हे खचितच.

मुळात माणसाच्या देवदेव करण्याच्या कल्पनाच फार मर्यादित आणि फार तर कर्मकांडाच्या असतात. कुठंतरी देवळात जाऊन येण्याच्या, एखादं पारायण करण्याच्या असतात किंवा कुठलीतरी एखादी चारधामसारखी यात्रा करून येण्याच्या असतात. हाही मुद्दा थोडा समजून घेण्यासारखा आहे. शेपाचशे वर्षांपूर्वी 'काशीला जाणं किंवा चारधाम करायला जाणं' म्हणजे काय होतं याचाही थोडा विचार करण्याची गरज आहे.

ज्या वेळी घनदाट अरण्यं होती, रस्ते माहीत नव्हते, अनेक प्रांतांतून जायला वाटा नव्हत्या, वाटेत अन्नपाणी-वाहनं अशा कुठल्या सोयी नव्हत्या, अशा वेळी 'काशीला जाणं' म्हणजे माणसाचं आयुष्यात एखादेवेळेस घडणारं आणि तेही अनेक वेळा अयशस्वी होणारं 'दिव्य' होतं. आधी एवढे शारीरिक कष्ट पेलण्याची कुवत असणारे कमी, त्यात जाऊन सुखरूप परतून येणारे त्याहून कमी. त्यामुळं काशीला जाताना 'निरवानिरव' करून निघण्याची गरज असे. त्यात 'नैमिषारण्य, कैलास' असल्या दुर्गम यात्रा तर महाकठीणच होत्या.

अर्थात त्या वेळी त्या निमित्तानं 'देवदर्शन' किंवा 'यात्रा' करण्याला जो 'तपश्चर्ये'चा अर्थ होता, त्यातलंही आज मुळात काय राहिलं आहे, हाच विचार करण्याची गरज आहे. जिथं दिवसाकाठी तीन वेळा वातानुकूलित काशी एक्सप्रेस सुटते आणि घरी परतीच्या टॅक्सीपर्यंत सर्व घरपोच व्यवस्था असते, अशा वेळी त्याला 'यात्रा' किंवा 'देवधर्म' मानणं किती उचित ठरेल, हाच मुळात विचार करण्याची गरज आपल्या लक्षात येईल. त्यामुळं अशा 'देवाचं करण्याच्या' कल्पना सोडूनच आपल्याला परमार्थाचा विचार आणि तो करण्याच्या वयाचा विचार करावा लागेल.

वास्तविक खऱ्या संतसत्पुरुषांनी ती आपली चुकीची, विषयासक्त जीवनपद्धती बदलण्याला, ती घडण्याला कारणीभूत होणाऱ्या मनाचा चुकीचा ढाचा बदलून आपली जीवनपद्धती ईश्वरानुकूल करण्याला 'परमार्थ' मानलेलं आहे. माझी कर्तव्यं अधिक दक्षतेनं, पण देवाच्या स्मरणात करण्याला प्राधान्य दिलेलं आहे ! कुठं अरण्यात किंवा दुर्गम गावाला जाण्याला नाही.

पण दुर्दैव असं की, स्पर्धा, हेवेदावे, असूया, आसक्ती अशा

मनाच्या चुकीच्या ढाच्यांना बरोबर मानून माणसं आयुष्य घालवतात आणि अशा प्रपंचाचा आयुष्यभर दु:खी करणारा अनुभव घेतात आणि या चुकीच्या ढाच्याचं मन बदलायचा परमार्थ मात्र आयुष्याच्या संध्याकाळी करायला निघतात - यांतला विरोधाभास, व्यर्थता लक्षात घेण्यासारखी आहे. मोठी माणसं स्वत:ही आयुष्यभर कौटुंबिक, सामाजिक हेवेदावे नि विघातक गोष्टी करतात, मुलांनाही ते वळण घालून देतात. तीही त्याच चुकीच्या पद्धतीनं आयुष्य घालवतात आणि मग मनाचा चांगला पक्का चुकीचा झालेला ढाचा बदलण्यासाठी गुरूंकडे किंवा देवाकडे जातात. अर्थात ती बुद्धी होणारेही कमीच.

अशा टळून गेलेल्या वेळी मग मन बदलणं किती कठीण झालेलं काम असेल याची कल्पना केलेलीच बरी ! काचेच्या किंवा लोखंडाच्या घट्ट होऊन पक्क्या झालेल्या गोळ्याला पुन्हा सरळ करून नवा आकार देण्याइतकं हे काम अवघड झालेलं असतं. अशा वेळी बाह्य कर्मकांडं करणंच अनेक लोक का पसंत करतात, ते सहज कळण्यासारखं आहे. पण त्यामुळं मूळ मन बदलून योग्य करण्याचा परमार्थाचा प्रश्न टळू शकत नाही. खरा परमार्थ टाळण्यासाठी 'यात्रे'चा मार्ग पत्करलेला माणूस यात्रेतल्या गैरसोयी नि भांडणं यांचा पाढा वाचत घरी येतो. एखाद्या प्रापंचिक सहलीवरून, कार्यक्रमावरून यावा तसा !

म्हणून मूळ काम परमार्थात योग्य मन घडवण्याचं ! ते करण्याचा अत्यंत योग्य काळ 'लहान वय' असं पूज्य आई का म्हणतात ते कळण्यासारखं आहे. इतकंच नव्हे ते गरजेचंही आहे.

यासाठी पूज्य आईंनी दिलेलं उदाहरणही श्रवणीय आहे. देवासाठी जी पालखी बनवतात तिचा दांडा एका एकसंध बांबूपासून बनवलेला असतो. ती खांद्यावर घेता यावी म्हणून त्या दांड्याला दोन्ही

बाजूंना विशिष्ट आकार दिलेला असतो. त्याचं उदाहरण देऊन पूज्य आई म्हणतात की, 'पालखीचा दांडा कोवळा असतानाच त्याला आकार द्यावा लागतो. कारण जून झाल्यावर वाकवायला गेलं तर तो मोडतो.' त्याप्रमाणं लहानपणी मन देवाकडं लावावं. म्हातारपणी ते जमत नाही.

आणि हे आपल्याला सहज पटण्यासारखं आहे. कारण अनेक प्रौढ, वृद्ध माणसं आपल्याला वेळोवेळी भेटत असतात. त्यांना खरा परमार्थ मनाचा आहे, निरपेक्ष प्रेम करण्याचा आहे, निखळ आनंदासाठी तो असतो, त्यासाठी तीच कर्मं पण वेगळ्या अलिप्त वृत्तीनं आणि ईश्वरार्पण बुद्धीनं करायची असतात वगैरे कळतं, पटतं. पण अशी मोठी माणसं हळहळतात, म्हणतात आता हे करावं वाटलं तरी मनाला लागलेल्या आयुष्यभराच्या चुकीच्या सवयी मोडणं आम्हाला आता कठीण आहे.

त्याचबरोबर हेही खरं आहे की, एका बाजूनं चुकीच्या संस्कारांनी, साचेबद्धतेनं, त्यात वयाबरोबर साठणाऱ्या अनुभवांनी, त्या अनुभवामुळं येणाऱ्या 'मी'पणानं मन पक्कं घट्ट होत जात असतं. त्यामुळं नवा, बरोबर विचार करण्याची त्याची तयारी कमीकमी होत जाते आणि दुसऱ्या बाजूनं माणसाची बदलण्यासाठी आवश्यक असलेली शारीरिक व मानसिक क्षमतासुद्धा वयाबरोबर कमीकमी होत जात असते. म्हणूनच बदल पुढंपुढं अवघड होत जातात. त्यामुळं हे काम 'लहानपणी'च करणं आवश्यक आहे, हे पूज्य आई का म्हणतात ते पटतं. अर्थात याचा अर्थ जर समजा खरा परमार्थ कळायला दुर्दैवानं, योगायोगानं उशीर झाला किंवा तोवर आपलं वृद्धपण आलं तर निराश होण्याचं कारण नाही. आपण सत्पुरुषांच्या मार्गदर्शनाप्रमाणं आता या वयात जरी काम सुरू केलं तरी ते उपयोगीच आहे.

फक्त त्याच बरोबर आता आपले अनुभव- मीपण, खरा परमार्थ

शिकताना आड येणार, शक्तीची उणीव भासणार याची जाणीव ठेवून, देवाला अधिक मदतीची प्रार्थना करून काम करणं हा पर्याय असू शकेल. त्याच बरोबर पुढच्या पिढ्यांच्या बाबतीत मात्र आपल्यावेळी घडलेली चूक टाळून त्यांना खऱ्या परमार्थासाठी लवकर वयात संधी देणं, प्रोत्साहित करणं हे परिमार्जनही उत्तम ठरेल.

एकूण पूज्य आईंचं वचन मोठ्यांनीही लक्षात घेण्यासारखं आहे आणि लहानांनीही ! मोठ्यांनी शिकण्यासाठी आणि लहानांनी खरा परमार्थ आणि खरी उपासना उत्साहानं करण्यासाठी !

*

३.

सत्यवचन ही कलियुगातली तपश्चर्या होय.
- पूज्य रामकृष्ण परमहंस

तपश्चर्या शब्दामुळं आपल्या मनात काही प्रतिमा उभ्या राहातात. एखादा तपश्चर्या करतो आहे म्हटलं की, तो एखाद्या झाडाखाली ऊनपावसात तटस्थपणे ध्यान लावून बसला असेल, कुठं एखाद्या मानससरोवर-अमरनाथ अशा दिशेनं मैलोगणिक रस्ता महिनोमहिने अनवाणी पायानं चालत सुटलेला असेल, वर्षानुवर्षं मित आहारावर किंवा साधा पाला अन् पाणी घेऊन उपवास करीत असेल अशा कोणत्यातरी कल्पना आपल्या मनात उभ्या राहातात. हेच काय असे असंख्य प्रकार आणि व्रतं या तपश्चर्येखातर करण्याच्या सूचना करणारे लोक आपल्याला पुरातन काळापासून भेटतात.

हे तपश्चर्येचं रूढ स्वरूप झालं. पण भगवान श्री रामकृष्ण परमहंस आपल्या सुवचनात सांगतात ते स्वरूप मात्र एक-दोन बाबतीत वेगळं आहे. श्री रामकृष्ण म्हणतात, 'सत्यवचन ही कलियुगातली तपश्चर्या होय.' कुठल्या ना कुठल्या स्वरूपात देहदंड सहन करून आपल्या विशिष्ट आदर्श पारमार्थिक ध्येयाकडं सातत्यानं मार्गक्रमण करीत असणं - हे तपश्चर्येचं सामान्य स्वरूप आहे. त्याचा कालोचित विचार व विस्तार या वचनात झालेला आपल्याला दिसून येईल.

या वचनात सांगितलेलं 'सत्यवचन' म्हणजे जाणीवपूर्वक,

हितबुद्धीनं, कल्याणकारी, योग्य, वाजवी असा शब्द देणं आणि त्यानुसार आचरण करणं, असं अभिप्रेत आहे. या 'सत्या'ला, 'खऱ्या'ला, त्याचा उच्चार आणि आचरण करण्याला, 'तपश्चर्या' म्हणावं इतकं मोठं महत्त्व त्यांनी का द्यावं, हे विचार करण्याजोगं आहे. त्यासाठी आपला सध्याचा व्यवहार पाहिला की, त्याचा उलगडा थोडाफार होऊ शकतो.

त्यासाठी माणसामाणसातले, संस्था-सरकार-दरबार, दोन देश, आपले-निसर्गाचे कुठलेही संबंध घेतले की त्यावर प्रकाश पडतो. या सर्व संबंधात आपले व्यवहार चालतात, ते बरेचसे शब्दांच्या साहाय्यानं. एकमेकांच्या व्यवहारांच्या,भावभावनांच्या संबंधात माणसं अनेक शब्द उच्चारतात,देतात-घेतात.प्रश्न पुढं त्यानुसार वागण्याचा असतो. वागण्याच्या वेळी ज्याचा-त्याचा स्वार्थ, अहंकार, फायदा-तोटा, हितसंबंध आड येतात.

मग जसं बोललो, कबूल केलं तसं वागण्याऐवजी त्या त्या वेळी जे जे सोयीचं, परवडणारं, फायद्याचं, शक्यतेतलं, तोशीस न लागता करण्यासारखं असेल, तेवढंच वागताना माणूस दिसतो. बाजारात एखादी साधी वस्तू-अगदी दुधाची पिशवी जरी घ्यायला गेलं, तरी त्यावर लिहिलेल्या, कबूल केलेल्या शब्दांप्रमाणं ती असेल याची खात्री देता येत नाही. वर लिहिलेली गुणवत्ता, वजन, प्रकार याप्रमाणंच वस्तू असेल याची खात्री नाही. तीच गोष्ट इतर वस्तूंचीही आहे.

याला काही तो शब्द देणारी ती दूधपुरवठा करणारी कंपनीच जबाबदार असेल असं नाही. वाहतूक करणारे, साठा करणारे, मोठे दलाल, छोटे विक्रेते, कुठलाही वाटेतला एखादा घटकही त्याचा शब्द न पाळणारा असू शकेल. म्हणूनच नामांकित कंपन्यांच्या दुधाची वाटेत बेमालूम भेसळ करणाऱ्या यंत्रणा मधूनमधून उघडकीला येत असतात.

प्रत्येक किलोमागे आणि लिटरमागे पाचपंचवीस ग्रॅम, जे सामान्य ग्राहकाला कळणारही नाहीत, ते काढून घेणारे लाखो लिटरमध्ये या 'असत्य आचरणा'नं किती काळा व दूषित पैसा निर्माण करीत असतील, याची कल्पना करणंही कठीण आहे.

असं एखाद्या छोट्या वस्तूचं तर मोठमोठ्या करारांचं-शब्दांचं कायकाय होत असेल याची कल्पनाच केलेली बरी ! दीड वर्षांत एखादं विशिष्ट दर्जाचं, आकाराचं, सोयीचं घर बांधून देण्याचा शब्द असो, किंवा दोन देशांतला अब्जावधी रुपयांच्या वस्तूंच्या पुरवठ्याचा कुठला शब्द असो. त्यांतल्या कुठल्याही टप्प्यावरच्या माणसाचा स्वार्थ, नफातोटा, लोभ, परिस्थितीचा फायदा उठवण्याची किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या - देशाच्या दुर्बलतेचा लाभ उठवण्याची वृत्ती मध्ये आली की, ते सारे शब्द किती सोयीस्करपणे फिरवले जातात आणि माणूस कसा बदलतो - हा अनुभव या काळात कुणालाही पदोपदी येत असतो. म्हणून 'सत्यवचना'ला रामकृष्ण एवढं महत्त्व का देतात ते कळण्यासारखं आहे, पटण्यासारखं आहे.

याच काळात याचं महत्त्व फार का आलं आहे, तेही कळू शकतं. कलियुगाचाच अर्थ स्वार्थ-अहंभाव-फायदा मिळवणं, त्यासाठी दुसऱ्याला लुबाडणं, आपले शब्द वेळी त्यासाठी फिरवणं अशा प्रवृत्ती बोकाळणं आणि अपरिमितपणे सर्वत्र वाढणं ! पूर्वी ही प्रवृत्ती नव्हती असं नाही, पण तिचं प्रमाण फार कमी होतं, सत्ययुगात तर नगण्य होतं!

याउलट विचारपूर्वक, हितबुद्धीनं, शब्द देण्याची आणि स्वत:ला तोटा झाला, झीज पडली तरी तो खरा करण्याची प्रवृत्ती कलियुगात नगण्य आहे, अशी स्थिती दिसते. म्हणूनच आपल्याला व्यवहारातदेखील असं आढळेल की, कुठल्या युगात नव्हता एवढा अविश्वास, संशय,

शंका या युगात आहेत. म्हणून या युगात कायदे-करार-अंमलबजावण्या-दंडशिक्षा असल्या गोष्टींचं प्रमाणही विलक्षण वाढलं आहे. विवाहाचासुद्धा करारनामा करून तो नोंदणीकृत करावा लागतो कारण कुणी वचन असत्य करण्याची, न पाळण्याची पहिल्या क्षणापासूनच भीती इतक्या जवळच्या संबंधातसुद्धा आहे, अविश्वास आहे.

सत्य हे परमेश्वरच आहे. परमेश्वराचं एक रूप आहे. म्हणून त्याची उपासना ही श्री रामकृष्ण एक तपश्चर्या मानतात. त्यांच्याच चरित्रातली छोटीशी घटना उद्‌बोधक आहे. श्री रामकृष्णांचं दर्शन व सहवास यांची ओढ निर्माण होऊन श्री तारकनाथ प्रथमच दक्षिणेश्वरी रामकृष्णांकडं आले. तारकनाथांचे एक मित्र दक्षिणेश्वरी राहात. त्यांच्या ओळखीनं तिथं उतरण्याची सोय तारकनाथांनी करून घेतली. तारकनाथांनी त्यांना त्यांच्याकडं मुक्कामाला परत येण्याचं वचन दिलं व ते दक्षिणेश्वरला आले.

प्रत्यक्षात रामकृष्णांची पहिलीच भेट असली तरी ती इतकी आनंददायक व पूर्वपरिचय असल्यासारखी होती की, तारकनाथांना त्यांच्याकडं घरच्यासारखंच वाटलं. रामकृष्णांनीही त्यांना त्यांच्याकडंच मुक्काम करण्यास सांगितलं. तारकनाथांनाही आपण तसंच करावं असं वाटत होतं. तरीही तिथल्या आपल्या मित्राला दिलेला शब्द त्यांना आठवला.

ते त्यांनी रामकृष्णांना सांगितल्यावर श्री रामकृष्ण म्हणाले, 'तसं असेल तर तू मुक्कामाला त्याच्याकडंच जा. आपण शब्द पाळले पाहिजेत. ती तपश्चर्याच आहे !'

तपश्चर्येत शरीरकष्टांची कल्पना प्रधान असली आणि ती सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं, आपल्याला जास्त परिचित असली तरी श्री भगवान रामकृष्णांनी या वचनात मांडलेली तपश्चर्येची कल्पना आणखीच

उचित आहे.

त्या कल्पनेत म्हणजे शब्दांची सत्यता ओळखण्यात आणि पाळण्यात ध्येय सत्यस्वरूप परमेश्वरप्राप्तीचंच आहे. या तपश्चर्येत उलट अधिक गरजेचे असलेले आणि प्रसंगी अधिक कठीण असलेले 'मनाचे कष्ट' आहेत. मन आपल्या स्वार्थाकडं, लोभाकडं, फायद्याकडं ओढ घेत असतं. त्यापोटी ते शब्द मोडायला आणि वेळी त्याचं वकिली समर्थन करायलासुद्धा तयार असतं.

अशा वेळी त्याला त्या स्वार्थ, अहंकार, फायदा असल्या नकारात्मक घटकांपासून परावृत्त करणं, खेचून सत्यमार्गावर आणणं यात शरीरकष्टांपेक्षा जास्त कष्ट आहेत. स्वत:च्या अंतिम हितासाठी, परस्परसंबंधातल्या आदर्श व्यवहारांसाठी आणि सामाजिक स्वास्थ्यासाठीसुद्धा हे कष्ट आवश्यक आहेत, उपयुक्त आहेत. हे कोणालाही पटण्यासारखं आहे.

शिवाय अंतिमत: ती 'सत्या'ची म्हणजेच ईश्वराचीच उपासना ठरते आहे, हेही लक्षात घेण्यासारखं आहे. असत्याकडं बुद्धी होण्याच्या आजच्या कलियुगाच्या काळात ही उपासना, ही तपश्चर्या कशी आहे, हे वेगळं सांगायलाच नको.

आधी म्हटल्याप्रमाणं वास्तविक, सत्पुरुषाचा सहवास, त्यांचं आमंत्रण, त्यातून मिळणारा लाभ ही सारी तशी सात्त्विक आणि म्हणूनच समर्थनीय गोष्ट वाटत असली तरी त्यातसुद्धा सत्यपालन करून मित्राला दिलेल्या शब्दाप्रमाणं त्याच्याकडंच राहायला जाण्याचा श्री रामकृष्णांचा सल्ला आपल्याला खूप काही सांगून जातो.

या सात्त्विक वाटणाऱ्या बाबीतही मनाला आवरण्यानं तप होत असेल तर,इतर असात्त्विक गोष्टींच्या बाबतीत त्याची गरज किती असेल

आणि ती तपश्चर्या किती मोलाची असेल !

शिवाय या वचनात सुचवलेली तपश्चर्या प्रत्येकाला, त्याच्या पातळीवर हरघडी करायला येणारी तपश्चर्या आहे. तिनं व्यक्तीचंही कल्याण आहे आणि समाजाचंही !

*

४.

देह गेला की कर्मभूमी अंतरली..!

- श्री रामानंद बीडकर महाराज

अनेक साधीसोपी वाटणारी संतवचनं पाहिली की, वाटतं की यांत काय विशेष आहे ? अनेक माणसं तर अशी संतवचनं वाचून त्यांतल्या वैशिष्ट्याची जाणीवसुद्धा न होता पुढं जातात, असंही आढळतं. वास्तविक जी वचनं जीवनाचा पुरेसा अनुभव घेतल्यावर शब्दरूप घेतात त्यांच्यामागं खूप मोठं दिशादर्शक बळ असतं. ऐहिक-पारलौकिक चिंतनाच्या तीव्र धगीतून तावूनसुलाखून बाहेर पडलेल्या सोन्याच्या झगझगीत, शुद्ध तुकड्यासारखी ती शुद्ध व प्रभावी असतात. त्यावर सखोल विचार केला, प्रत्यक्ष आपल्या आयुष्यात त्यात सुचवलेल्या दिशेचा प्रयोग केला, त्यात आलेल्या सत्याचा काही अनुभव घेतला तर अशा वचनांचं मोल कळतं. ते सत्य शब्दबद्ध करणाऱ्या संतांची थोरवी कळते. अनेकदा आपल्या आयुष्याला विधायक वळण मिळतं.

हा अनुभव देऊ शकणाऱ्या अनेक वचनांपैकीच हे एक वचन आहे. ते थोर आणि उपयोगी अशासाठी आहे की, ते माणसाला प्रपंच आणि परमार्थ दोन्हीही उत्तम करायला जागृत करतं. या वचनाचं पहिलं वैशिष्ट्य यात आहे की, माणसाला देह आहे याची जाणीव ते करून देतं. आपण क्षणभर असा विचार करून पाहू की, एखाद्या सामान्य प्रापंचिकाला, गृहस्थाला आपण विचारलं की, 'तुम्हाला देह आहे, याची

तुम्हाला जाणीव आहे का ?' तर आपण काहीतरी चुकीचं विचारतो आहोत किंवा काहीतरी वेड्यासारखं विचारतो आहोत, अशा मुद्रेनं तो आपल्याकडं पाहील. त्याच्या पाहाण्यात असा भाव असेल की, 'एवढा मी समोर आहे,तो दिसत नाही का?' साध्या भाषेत 'डोळे नाहीत का?'

त्याचं हे विचारणं बरोबर आहे, असंच अनेकांना वाटेल. त्यातही नुसतं पाहाण्याऐवजी एखादा प्रत्यक्ष म्हणेल, 'अरे बाबा, देह आहे, म्हणून तर तू विचारतोयस आणि मी बोलतोय ना?' तर अशी प्रतिक्रियासुद्धा रास्त होईल, असंच अनेकांना वाटेल ! पण वरवर साध्या भाषेत वाटणाऱ्या प्रश्नाचं उत्तर एवढं साधं का आहे ? देह तर या सर्व विचारणाऱ्यांना, उत्तर देणाऱ्यांना आहे. पण त्यांना देह आहे, त्यांना देह मिळालेला आहे, याची जाणीव किती जणांना असेल ? स्वत:ला देह आहे यामध्ये स्वत: कुणीतरी वेगळे आहोत, हे भान आधी गृहीत आहे. ते किती लोकांना असतं हा पहिला प्रश्न आहे.

मग दुसरी बाब अशी की, एखादी वस्तू आपण काही उपयोगासाठी आणतो, बाळगतो तशी या देहाबद्दल आपली भूमिका आहे की आयुष्यभर बेसावधपणे जसा असेल तसा, जसा जमेल तसा, निरुद्देश्यपणे, कुठल्याही कामासाठी किंवा त्याला सुखाचं होईल अशासाठी आपण तो वापरतो आहोत ? किंवा अधिक योग्य बोलायचं झालं तर आपण देह बेसावधपणे, त्याला सुखाचं होईल, असा वापरतो आहोत, असंच आढळेल. कारण तसं नसतं तर देहसुखाच्या साधनांची इतकी अपरिमित वाढ झाली नसती आणि देहाच्या सुखासाठी काहीही करायला तयार होणारे लोक इतक्या प्रचंड प्रमाणात बाहेर आढळले नसते.

वास्तविक आपण एखादी वस्तू आणतो ती तिची उपयुक्तता पाहून, निवडून आणि ती वापरतो ती आपल्या काही ध्येयासाठी,

उद्दिष्टांसाठी. अगदी साधं एखादं पेन जरी घेतलं, तरी आपल्या लिहिण्याच्या गरजा-आवश्यकता पुऱ्या करू शकेल अशाच प्रकारचं ते आपण निवडतो. वापरतानाही लेखन असो, परीक्षा असो जे काम असेल त्यावेळी ते उपयोगाला येईल इतकंच ते नीट ठेवण्याकडं आपला कल असतो. ते आपण जपून, योग्य ठिकाणी जरूर ठेवतो. पण त्याचे कुठले लाडकौतुक करीत नाही.

खरं सांगायचं, तर श्री बीडकर महाराज आपल्याला सावध करीत आहेत ते देहाबद्दलच्या आपल्या सध्याच्या भूमिकेबद्दल आणि खऱ्या गरजेच्या आणि आवश्यक असलेल्या भूमिकेबद्दल. देह हा आपल्या भगवंतप्राप्तीच्या मूळ कामासाठी किंवा केवळ प्रापंचिक स्वास्थ्याचं ध्येय ठेवलं तर त्यातल्या प्रगत स्थितीसाठी जी कर्मं करावी लागतात, जे प्रयत्न करावे लागतात, त्यासाठी एक उत्तम वस्तू किंवा साधन म्हणून बाळगलेली किंबहुना सुदैवानं मिळालेली गोष्ट आहे.तो वेळेला उपयोगी पडेल असा ठेवणं हे गरजेचंच आहे, पण त्यालाच सर्वस्व समजून त्याचे लाड करण्यात गुंग झालो तर ते अनावश्यकच नव्हे तर माणसाला अंतिमत: हानिकारकच आहे.

दुसरी बाजू अशी की, देहाबद्दल एक साधन म्हणून जशी जागरूकता अपेक्षित आहे तशी ध्येयाला सतत अनुकूल अशी कर्मं करीत राहाण्यातली तत्परताही अपेक्षित आहे. कारण देहाच्या रूपानं आपल्याला चालणं-बोलणं-ऐकणं-पाहाणं-विचार करणं-लक्षात ठेवणं-कृती ठरवणं-करणं अशा अक्षरश: असंख्य क्षमता वापरायला मिळालेल्या असतात. आपण बेसावध राहिलो, निवांत राहिलो, रेंगाळलो, निरुद्योगी किंवा आळशी राहिलो तर अर्थातच या क्षमता वाया जातील, ही संधीही वाया जाईल आणि ध्येयप्राप्तीही दूर राहील - मग ते स्वत:चं लौकिक

कल्याण असो, समाजाचं काही हित असो किंवा मुक्ती असो. त्या सर्व गोष्टींसाठी लागणारे प्रयत्न हा देह आणि त्याच्या साऱ्या क्षमता आहेत तोवरच शक्य आहेत, हे कधीही डोळ्यांआड होऊ न देण्यासारखं महत्त्वाचं सत्य आहे.

त्यासाठी या साऱ्या क्षमता प्रत्यक्ष कार्य करीत आहेत तोवरच विनाआळस, उद्यमशील राहाणं किती गरजेचं आहे, हे संतांची थोर महात्म्यांची, समाजसुधारकांची, शास्त्रज्ञांची आयुष्यं अभ्यासली तरी लक्षात येईल. देहाच्या साऱ्या क्षमता कार्यक्षम असेपर्यंतच आपला कार्यभाग साध्य करण्यावरचा भर आपण का देतो आहोत, ते आपला प्रपंचातला साधा अनुभवही सांगू शकेल.

आळशीपणानं क्षमता असून विद्यार्थिजीवनाचा उत्तम यशासाठी उपयोग न केल्यानं दारिद्र्यात दिशाहीन आयुष्य काढणारा माणूस असो, एखादा भारभूत समाजघटक असो किंवा म्हातारपणी ज्ञानेश्वरी वाचू म्हणून बसलेला आणि अखेर ती हातात उचलत नाही, वाचायला दिसत नाही अशी स्थिती होऊन अमोल लाभाला मुकलेला वृद्ध असो-सारी उदाहरणं श्री बीडकर महाराजांच्या या संतवचनाच्या सत्यतेची साक्ष देणारीच आहेत.

म्हणून देह ही कर्मभूमी आहे, हे ओळखून त्याच्या क्षमतांचा वेळीच वापर करून लौकिक आणि पारलौकिक ध्येयप्राप्ती गाठणाऱ्याला हे वचन किती मोलाचं आहे, हे वेगळं काय सांगावं ?

*

५.

सत्पुरुषसान्निध्यच तारक होय. मग त्यांनी उपदेश निराळा काय करायचा ?

- पूज्य टेंबे स्वामी

आपला सबंध दिवसाचा कार्यक्रम पाहिला तर उजाडल्यापासून झोपेपर्यंत सतत वेगवेगळ्या घटकांकडून वेगवेगळ्या अपेक्षा बाळगण्यात दिवस जातो, असं लक्षात येईल. इतकंच काय झोपेतसुद्धा ती झोप गाढ लागावी, शांत लागावी, झोपमोड होऊ नये, स्वप्नं पडू नयेत, पडली तर ती अमुकच पडावी - अशा असंख्य अपेक्षा बाळगण्याची माणसाला सवय आहे. पुऱ्या झाल्या की सुख आणि अपुऱ्या राहिल्या, भंग पावल्या की दु:ख हा दिनक्रम माणसाला चुकत नाही.निरपेक्ष माणूस भेटणं विरळाच असतं.

सततच्या या अवाजवी अपेक्षांच्या व्यापारात आपलं एक महत्त्वाचं नुकसान होत असतं, याकडं लक्ष जात नाही. ते असं की, रोजचा दिवस किंवा सध्याची परिस्थिती, वर्तमानकाळ अनेक चांगल्या, विधायक, उपयुक्त गोष्टी घेऊन येत असतो. त्यांच्याकडं लक्ष गेलं, त्यांचा विचार करता आला, लाभ घेता आला तर आजचं जीवन, आजचा दिवस अधिक आनंदाचा करणं, प्रगतीचा करणं, सार्थकाचा करणं शक्य असतं. पण या अपेक्षांच्या सततच्या उपद्व्यापात या गोष्टींकडं लक्षच जात नाही. लक्ष गेलं तर त्यांचा लाभ घ्यायला,विचार करायला या अपेक्षांच्या

व्यापापुढं वेळच राहात नाही. अर्थात यामुळं होणारं नुकसान आपलंच असतं.

हे जसं सामान्य माणसाचं नेहमीच्या आयुष्यात होतं, तसंच तो परमार्थाला लागला, काही साधना करू लागला तरीही होतं, याचं दिग्दर्शन करणारं हे पूज्य टेंब्ये स्वामींचं वचन आहे. असा अपेक्षा बाळगणारा माणूस परमार्थाला लागला की, त्याला कधी कुणा सत्पुरुषांचा, संतांचा सहवास घडतो. अशी सत्पुरुषांच्या सहवासात राहाणारी असंख्य माणसं असतात. कुणी कायम घरात बरोबर राहाणारे, कुणी दिवसाकाठी काही वेळ सहवासात येऊन जाणारे, कुणी आठवड्यातून, कुणी महिन्यातून, कुणी आणखी कधी सहवासात येऊन जाणारे असतात.

प्रपंचात अपेक्षा बाळगण्याची सततची सवय लागलेली ही माणसं परमार्थातही सत्पुरुषांकडून सतत अपेक्षा बाळगत राहातात. दर्शन होणं, भेट होणं, सहवासात राहायला मिळणं-यांतच त्यांची आणखी एक महत्त्वाची अपेक्षा अनेकदा असते - ती म्हणजे संतांकडून काही उपदेश, मार्गदर्शन मिळण्याची. ही अपेक्षा चांगल्यासाठी असली, ती बाळगणं एरवी चूक नसलं, तरी ज्यांना सहवास मिळतो, त्यांनी त्यावर विचार करावा अशी ती आहे, हे नक्की. वास्तविक, कोणत्याही प्रकारे, कितीही काळ मिळणारा सत्पुरुषसहवास, सान्निध्य हीच मुळात एवढी मोठी गोष्ट असते की, ती गोष्टच दुर्लभ आहे, पुरेशी आहे, हेच लक्षात येत नाही.

सत्पुरुषांचा सहवास ही इतकी साधी, सामान्य गोष्ट नसते. त्यांचं प्रत्यक्ष जगणं, साध्यासाध्या क्रिया, बसणं, उठणं, देणंघेणं, बोलणंचालणं, संबंध ठेवणं, विविध घटकांचा विचार करणं, सातत्यानं भगवंताचं भान आणि संदर्भ असणं, इतकंच काय त्यांचा हास्यविनोद, वेळी रागावणं - खरं तर सारंच आपल्याला शिकण्यासारखं असतं. तसा विचार केला तर क्षणभर लक्षात येईल की, वाणीनं उपदेश करणं एक वेळ

मर्यादित असेल, पण प्रत्यक्ष ते जगणं फार व्यापक आणि नीट पाहाता आल्यास परिणामकारक असतं. आपल्या खऱ्या प्रगतीला फार उपयोगी असतं.

त्यामानानं बोलण्याला, वाणीनं केलेल्या उपदेशाला एक वेळ मर्यादा असतात, पण सत्पुरुषांच्या सहवासात प्रत्यक्ष जगताना त्यांनी अंमलात आणलेल्या तत्त्वांतून शिकण्याला मर्यादाच नसतात. सहवासातून खूप शिकता येतं. शिवाय उपदेशात उच्च तत्त्वं असली, तरी व्यवहारात ती अंमलात कशी आणावी, अंमलात आणताना येणारे अडथळे दूर करण्यात कसं आणि कोणतं कौशल्य असावं - अशा अनेक गोष्टी उलट प्रत्यक्ष सान्निध्यात राहातानाच खऱ्या कळतात. त्यांचं जीवन हाच त्यांचा खरा, व्यापक आणि प्रत्ययकारी उपदेश असतो.

पण हे सारं कळायला आपल्या त्या सततच्या अपेक्षांच्या नेहमीच्या स्वभावाला मुरड घालावी लागते. मग आपल्याला या सहवासाकडं, त्यातून शिकायच्या गोष्टींकडं पाहायला वेळ मिळेल, तशी पाहायची दृष्टी जोपासता येईल. म्हणून स्वामिमहाराज म्हणतात की, सान्निध्यात असताना वेगळा उपदेश तो काय करायचा ? तशी पुन्हा उपदेशाची अकारण अपेक्षा बाळगून असलेल्या प्रभावी सहवासाचा उपयोग न करू शकणाऱ्यांना यातून खूप काही शिकण्यासारखं आहे. अन्य संतांच्या आयुष्यातही हे अनेकदा घडलेलं आढळतं.

श्री गुरुदेव रानडे यांनी आत्मचरित्र लिहिलं नाही. उपदेश विचारणाऱ्यांनासुद्धा ते अनेकदा सांगत, इथं आश्रमात घरी या, माझ्याबरोबर राहा, शिका. तोच माझा उपदेश. आश्रमात एकदा बाहेरून रात्री आलेल्या आणि सकाळी लगेच परत जायचं असलेल्या माणसाशी ते रात्री चार तास काही उपदेशपर बोलले. ते सकाळी कळल्यावर आश्रमात श्री गुरुदेवांच्या सहवासात महिनाभर असलेल्या साधकांना

जरा वैषम्य वाटून ते म्हणाले, 'तुमची योग्यता मोठी, तुम्ही एक रात्र आलात तर गुरुदेव तुमच्याशी चार तास बोलले. आम्ही महिनाभर इथं असून आमच्याशी ते पाच मिनिटंसुद्धा बोलले नाहीत.' गुरुदेवांना हे कळल्यावर त्यांनी ते वैषम्य दोन वाक्यांत दूर केलं.

गुरुदेवांना सुचवायचं होतं की, अशा किंचित काळ येऊन जाणाऱ्या साधकाशी बोलण्याची गरज आहे, पण जे इथं महिनाभर सहवासात आहेत त्यांच्याशी आणखी काय वेगळं बोलायचं, कोणता उपदेश करायचा ? ते तर सहवासात प्रत्यक्ष, उदंड शिकत आहेत ! यातूनही आपण बोध घ्यावा, अशीच ही घटना आहे.

श्री टेंब्येस्वामी म्हणतात तसा सत्पुरुषांच्या सहवासाकडं बघण्याचा दृष्टिकोन आला तर आपलाच फायदा आहे. यदाकदाचित सत्पुरुषांचा प्रत्यक्ष सहवास न घडला तर ? त्यासाठी सत्पुरुषांची जीवनचरित्र हा तर कुणालाही मिळू शकणारा सहवास आहे. त्यांतल्या घटना वाचताना हीच सहवासातून शिकण्याची दृष्टी ठेवली तर श्री स्वामींच्या म्हणण्याचा प्रत्यय व उपयोग आजही कुणालाही करून घेऊन आपलं कल्याण साधता येईल, हेही खचितच !

*

६.

...हे खरे अन्नदान ।

- पूज्य नानामहाराज तराणेकर

आजचा काळ अनेक सत्प्रवृत्तींच्या दृष्टीनं, सदाचारांच्या दृष्टीनं बराच प्रतिकूल असलेला आढळतो. तसा खरं तर प्रत्येक शतकात तो असल्याचं आढळेल. फक्त गेल्या शतकात एका बाजूनं शास्त्रीयतेची, वैज्ञानिकतेची पूर्वी कधी नव्हती एवढी वाढ झाली. तिचे परिणाम म्हणून सदाचारातली, काही आचारधर्मांतली अवडंबरं लक्षात आली, गळून पडली. हे अत्यंत चांगलं आणि सत्यधर्माचंच काम झालं. पण झाडाची अस्ताव्यस्त झालेली वाढ, त्यावरची बांडगुळं, काटेकुटे, जीर्णशीर्ण भाग छाटून काढताना जर बेसावधता किंवा या छाटणीच्या कामाची एक प्रकारची गर्कता असली तर कोवळी पालवी आणि चांगली चांगली पानं, फांद्यासुद्धा छाटल्या जातात, असं आपण पाहिलं असेल.

तेच अनेकदा या तर्काची नि शास्त्रीयतेची शस्त्रं चालवण्यात झालेलं आढळेल. अर्थातच या बेसावधपणामुळं शुद्धभावानं करायच्या अभ्यासाच्या अभावामुळं आपल्या जीवनपद्धतीतल्या अनेक चांगल्या चांगल्या गोष्टीही छाटल्या जाऊ लागल्या. त्यानं प्रत्येकाच्या आयुष्याला तर्काची-वैचारिकतेची कर्कशता, स्वार्थाची- चैनवादाची कळा आणि समाजजीवनाला व्यापारवाद -उपयुक्ततावाद आणि पशुजीवनाची अवकळा आली हेही या शतकातलं दुर्दैवी सत्य आहे.

जी माणसं या साऱ्या प्रगती, घटना, परिणाम यांविषयी सावध होती, त्यांनी या शास्त्रप्रगतीचा, त्यामुळं आलेल्या जीवनपद्धतीचा योग्य अंगीकार केला, त्याबरोबर आलेल्या त्याज्य गोष्टींना दूर ठेवलं, आपल्या प्राचीन संस्कृतीतलं विधायक, मानवतावादी शाश्वत होतं ते जपलं. अशांच्या प्रयत्नांनी, हे सारं दूरदर्शीपणे जाणू शकणाऱ्या याच शतकाच्या साक्षीदार असलेल्या द्रष्ट्या महापुरुषांनी दिशा दिली. त्यांतले एक महापुरुष म्हणजे इंदौरचे विख्यात सत्पुरुष पूज्य नानामहाराज तराणेकर होत.

अत्यंत कर्मनिष्ठ, वैदिक, योगी, आचारनिष्ठ अशा पूज्य टेंब्येस्वामींचे ते अनुगृहीत परमशिष्य होत. स्वतःचं यज्ञ - योग - वेद -वेदांग आदींचं उत्तम ज्ञान आणि आचरण असूनही आजच्या शतकातल्या घडमोडी, माणसाच्या जीवनव्यवहारात होत चाललेले बदल, त्यांत मूळ सात्त्विक, शुद्ध, हितकर गोष्टी जपण्याची आत्यंतिक गरज, सामान्य माणसांच्या कुवती यांचं यथार्थ ज्ञान आणि या साऱ्याची प्रत्यक्ष व्यवहाराशी सांगड घालण्याची आणि उचित आचारधर्म देण्याची उत्तम, अलौकिक प्रज्ञा श्री नानामहाराजांकडं होती.

म्हणून त्यांनी आचारातले मूळ हेतू, दृष्टिकोन, त्यांतली हितबुद्धी यांचाही एकीकडं विचार केला, अनेकांना त्यांतलं खरं काय ते बघायला लावलं. कर्मठतेपेक्षा हेतू लक्षात घेऊन कामं करण्याचा व्यवहार्य आणि हितकर उपदेश केला. त्यानं अक्षरशः अगणित लोकांचं, त्यांच्या प्रपंचाचं कल्याण झालं, समाजातली शांतता, संतुलन, प्रेम टिकलं, वाढलं. माणसं निःस्वार्थी, निरपेक्ष घडू शकली.

त्या संदर्भात त्यांनी जे अनेक उपदेश दिले, मार्ग दाखवले, त्यांतलं एक सुवचन 'खऱ्या अन्नदाना'च्या संदर्भातलं आहे. अन्नदानाबद्दल श्री नाना महाराजांचा एक विशेष कटाक्ष आहे. तो सामान्य जीवाला

अन्नाबद्दल असलेली गरज-ओढ व तृप्ती यांमुळं आहे. जीवाला सहजपणे तृप्त करू शकेल अशी अन्नासारखी दुसरी गोष्ट नसल्यानं प्रत्येकाच्या आयुष्यात अन्नदानाला योग्य महत्त्व देण्यावर त्यांचा भर असे. स्वतः तर आयुष्यभर त्यांनी ते घरी आचरलं, आचरून घेतलं.

असं असलं तरी दान करायचं अन्न शुद्ध असायचं तर ते पैशासारखंच चांगल्या मार्गानं मिळवलेलं असणं पूज्य नाना आवश्यक मानीत. त्यासाठी मिळवतानाचे स्वतःचे कष्ट असणं, मिळवण्याचे मार्ग प्रामाणिक असणं, सचोटीचे असणं - हे ते महत्त्वाचं मानीत. त्यातही या दानामागची खरी मनोवृत्ती कशी असावी, तयारी कोणती असावी ते सांगताना श्री नाना महाराज म्हणतात,'आपल्यासमोर वाढलेलं ताट आनंदानं दुसऱ्यासमोर ठेवायची मनाची तयारी - हे खरं अन्नदान !'

यात अन्नदानाच्या अनेक बाजूंवर प्रकाश पडतो. दान करणारा करतो, पण ते स्वतःचं सारं सुरळीत, सुखरूप, पुरेसं राखून मग करतो. त्यामुळं दानासाठी त्यानं सोसलेली झळ नगण्य असते. कित्येक माणसं तर आपण किती रक्कम दिली ते पाहातात. आपल्याकडं किती आहे, त्याच्या प्रमाणात आपण किती दिलं ते पाहात नाहीत आणि खरं मर्म ते पाहाण्यातच असतं. तेच अन्नाचं.

दुसरं असं की, माणसाला काही द्यायचं म्हटलं की ते जरा कमी प्रतीचं,कसंही असलं तरी चालेल असं वाटतं. त्यावर या वचनात प्रकाश आहे. मी मला अन्न जसं,ज्या दर्जाचं,जेवढं अपेक्षित करतो,तेच सारं मी द्यायच्या अन्नात पाहू शकलो पाहिजे. मग द्यायच्या साड्या-वस्त्रंसुद्धा स्वतः वापरण्याच्या वस्त्रांच्या दर्जाची आणि किमतीची राहू शकतात.

याच संदर्भात सर्वांत महत्त्वाचं हे की, देताना स्वतःला पूर्ण झळ लागली, तरी द्यायची इच्छा आणि तयारी असणं.अशी वेळ आली

म्हणजे आपलं मन दानासाठी खरोखर किती तयार झालं आहे, याची खरी परीक्षा होऊ शकते. ती परीक्षा इतकी सूक्ष्म आहे की, एक वेळ निग्रहानं ते केलं गेलंच तर मनात त्रास-त्रागा किंवा अहंकार काही उरण्याची शक्यता मोठीच असते. इथं आपलं ताट 'आनंदानं' देण्याची तयारी ही कसोटी श्री नाना महाराज का मानीत असतील त्याचं मर्म कळेल.

या किंवा अशा प्रकारच्या खऱ्या आचारधर्माचा अभ्यास आणि आचरण केलं तर ते व्यक्तीचं उन्नयन घडवतं आणि तो राहातो त्या समाजाचंही. मग बाहेरचे भौतिक बदल स्वास्थ्याला विघातक न ठरता पूरकपणे घेता येतील.

अर्थात त्यासाठी श्री नाना महाराजांच्या अन्य महत्त्वाच्या उपदेशाचा अभ्यास मार्गदर्शक ठरेल, हे काय सांगायला हवं ?

*

७.

ज्याची देहावरी सत्ता ।
तोच जाणे भगवंता ।।

- श्री विश्वनाथ महाराज

माणसात ज्ञानाची ओढ जन्मत:च आहे. लहान मूल झालं तरी ते, हे काय आहे, हे कशाकरता आहे, हे कुणाचं आहे - असे असंख्य प्रश्न विचारतं, उत्तर शोधतं-मिळवतं. अनेकदा तर असे प्रश्न उत्तर मिळालं नाही तरी मनात प्रलंबित राहातात, अगदी खूप वर्षंसुद्धा राहातात आणि तरीही ती जिज्ञासा कायम राहाते. उत्तर लगेच मिळाल्यावर जसं जाणल्याचं, कळल्याचं समाधान होतं तसंच ते अनेक वर्षांनी अशा एखाद्या जुन्या प्रश्नाचं उत्तर मिळाल्याचंही समाधान होतं. यात कळण्याची ओढ आणि कळल्यानंतरचं समाधान लहान मुलासारखं मोठ्या माणसालाही आहे.

या जाणण्याचे विषय कसे असतात, ते पाहिलं तर लक्षात येईल की, अन्नपाणी, सुखसोयी, देहाच्या गरजा अशा विविध कारणांनी आणि विषयांवर मनुष्य समजून घेत असतो. साधं अन्न घेतलं तर प्रथम दूध-भात-भाकरी-पोळी-पाणी असा प्रवास करीत माणूस शोधीत असतो. देहाच्या गरजांपोटी शोध आणि ज्ञान मिळवणं असं सुरू असतं. ते ते ज्ञान मिळालं की पुढचा शोध सुरू होतो. प्रथम गरजेच्या अन्नाच्या आणि पाण्याच्या शोधात असलेला माणूस पुढं बदलाच्या आणि चवींच्या

शोधात आणि ज्ञानाच्या प्रांतात कधी शिरतो ते बहुधा त्यालाही कळत नाही.

त्यांतही या साऱ्या देहाच्या सुखाचं आजकालचं प्रधान साधन पैसा. मुळात आपल्या गरजा पुऱ्या करण्यासाठीही तो लागतो, हे निर्विवाद. पण जी गोष्ट अन्नाच्या गरजेची होते तीच त्या पैशाचीही होते, हे लक्षात घेण्यासारखं आहे. माणसाला पाणी गरजेचं आहे, अगदी शरीरयंत्रणा चालती ठेवण्यासाठीसुद्धा. तीच अवस्था घरात पाणी साठवण्याची आहे. घरातले स्वयंपाकापासून स्वच्छतेपर्यंतचे सर्व व्यवहार चालायचे म्हणजे नुसतं, येईल तेव्हा पाणी वापरू, म्हणून थोडंच चालतं?

आलेल्या पाण्याच्या गरजेसाठी किमान साठा प्रत्येकाला घरात करावा लागतो. या गरजेच्या साठ्यानं नुकसान तर नसतंच, पण व्यवहार सुकर होतो. पण पाण्याची गरज म्हणून काही कुणी घरभर पाणी भरण्याच्या प्रयत्नात राहात नाहीत. निम्मं घर पाण्यानं भरलं तर आता ती केवळ पाण्याची हौस झाली, संचय झाला. अशा संचयानं व्यवहार सुकर होण्याऐवजी व्यवहारात अडथळे निर्माण व्हायची आणि वेळी सांडलवंड घडून नुकसान व्हायचीच शक्यता जास्त. म्हणून गरज, हौस, संचयवृत्ती हे सारं ओळखून आपापले व्यवहार तपासण्याची गरज असते.

तीच गोष्ट माहिती, वस्तू, घरंदारं, इस्टेटी आणि वर म्हटल्याप्रमाणं विशेषत: पैशाच्या बाबतीत आहे. त्यातही गरज ओळखून साठवणारा सुखी तर हौस, संचयवृत्तीचा असमाधानी हे आढळून येईल. या साऱ्यासाठी माणसाची ही जाणण्याची क्षमता, काळ हे इतकं खर्ची पडतं की, त्याबद्दल सावध असलेले लोक फारच कमी आढळतात.

सावध झालं तर हे लक्षात येईल की, ही जिज्ञासा, क्षमता माणसाकडं दिली आहे, ती क्षमता आज फक्त स्वत:च्या देहाच्या सुखाकडं,

त्याची साधनसामग्री गोळा करण्याकडं लागली आहे. अनेकांचं आयुष्य जातं तरी त्यांना याची जाणीवही होत नाही. शिवाय हे कधी लक्षात येत नाही. देहासाठी जाणण्याची-ज्ञानाची शक्ती आयुष्याच्या अंतापर्यंत वापरली तरी माणसाला पुन्हा अपुरेपण राहातं, शाश्वत समाधान काही सापडत नाही. किंबहुना हेही अनेकदा लक्षात येत नाही. देहाची सुखं कितीही वाढली तरी मनुष्य अंतर्यामानं शांत, प्रसन्न, समाधानी होईल अशी शक्यतासुद्धा नाही.

हे लक्षात आलं तर, काय जाणलं म्हणजे ही शांती, समाधान येईल याचा शोध माणसाच्या आयुष्यात सुरू होतो. हा शोध म्हणजेच भगवंताचा शोध होय. हा भगवंत जाणण्याचे, शोधण्याचे प्रयत्न जे करतात त्यांच्यासाठी एक अत्यंत मोलाची सूचना श्री विश्वनाथ महाराजांच्या या अभंगातल्या वचनात आली आहे. ते म्हणतात,'ज्याची देहावरी सत्ता । तोचि जाणे भगवंता ।।'

शाश्वत आनंद किंवा समाधान हवं असेल तर आपल्याआपल्या देहावर आपली सत्ता चालली पाहिजे. ही देहावरची सत्ता म्हणजे स्वामित्व, म्हणजे आपण म्हणू तसं वागण्याची आपल्या देहाची तयारी होय.

आज दुर्दैवानं अशी परिस्थिती असते की, देहानं एखादी गोष्ट मागितली तरी नाही म्हणण्याचं सामर्थ्य फार कमी लोकांच्या ठिकाणी असतं. देहाची एखादी गैरसोय, उणीव, आजारपण, दु:ख, त्रास, झीज सोसण्याचं सामर्थ्य फार कमी लोकांकडं आढळतं. उलट माणूसच त्याच्या देहाच्या ताब्यात आहे. यात गरज आणि हौस-चैन-संचय यांमधला फरक लक्षात ठेवून पाहावं.

देहाला तहान, म्हणजे आपण पाण्यासाठी पळणार हे खरं असलं तरी एखादी पूजा - प्रार्थना - उपास - प्रवचन चालू असलं तर हे पळणं

थोडा काळ पुढं नाही का ढकलता येणार ? अगदी देहाचे हाल करून, बेशुद्ध होऊन नको, पण थोडं तरी आपलं त्याच्यावर स्वामित्व म्हणून ते करता येऊ शकतं आणि ते घडलं तरच भगवंताच्या ज्ञानाला, त्याच्या साधनेला सुरुवात होईल. ते अधिक तीव्रतेनं झालं तर भगवंत म्हणजे शाश्वत आनंद प्रत्यक्ष गाठ पडेल, नांदेल, अनुभवाला येईल.

त्यासाठी सुरुवातीला चर्चा केलेल्यातला एक मुद्दा लक्षात ठेवण्याची गरज आहे की, आपण देह मागेल ते करीत जाऊन देहाच्या गुलामीत अडकलो आहोत. थोडं थोडं त्याची हौस-चैन मग त्यासाठी संचय एकेका पावलानं कमी करीतच त्याच्या दास्यत्वातून मुक्त होऊ शकू.

आपण ताडातोडी, निग्रह करू शकणारे कुणी योगमार्गी नसलो तरी देहाला आणि त्याच्याच सारखा विचार करणाऱ्या मनाला हळूहळू वळवणारे भक्तिमार्गी जरूर आहोत, असावं. आपल्याला एकदम न जमली तरी हळहळू 'देहसत्ता' येईल आणि भगवंत किंवा खरा आनंद मिळवायला लागणारं स्वास्थ्य, अलिप्तता, साक्षित्व, निर्धार अशा गोष्टी येतील.

ज्यांतून खऱ्या अर्थानं आपल्याला भगवंताची ओळख आणि सहवास लाभेल आणि श्री विश्वनाथ महाराजांच्या वचनातला 'भगवंत जाणणं-होणं' हेच आपल्याला उपजत मिळालेल्या ज्ञानाच्या ओढीचं, जिज्ञासेच्या शक्तीचं खरं चीज ठरेल !

*

८.

देवाच्या विद्यापीठात जन्मभर विद्यार्थी म्हणून राहावे लागते.

- पूज्य गुरुदेव रानडे

आजच्या माणसांना शिक्षण आणि विद्यार्थीपण नवीन नाही. विद्या कुठल्याही शाखेची-प्रकारची असो, माणसाला ती मिळवण्याची गरज आणि इच्छा झाली की माणूस 'विद्यार्थी' व्हायला पात्र झाला. अर्थात ही नुसती पात्रताच झाली. कारण स्वत:जवळ ज्ञान नसलं आणि ते मिळवणं आवश्यक असलं की, 'गरज' निर्माण होऊ शकते. तसं आपल्या अज्ञानाची जाणीव जर आपल्याला खऱ्या अर्थानं असेल, तर आपल्याला अनेक गोष्टींच्या, विद्यांच्या ज्ञानाची गरज असतेच. पण म्हणून सारीच माणसं शिकतात असं नाही. गरज असली तरी न शिकणारे लोक असतातच. काही वेळा आपल्याला शिकण्याची गरज नाही अशा भ्रमात ते असतात किंवा काही वेळा त्यांच्याजवळ शिकण्याची नम्रता, तळमळ नसते !

म्हणून 'गरज' असतेच, पण त्याला 'शिकण्याची इच्छे'ची जोड लागते. अर्थात एवढ्यानंही 'विद्यार्थी'पण येत नाही. असे गरजेमुळं शिकण्याची इच्छा असलेलेही खूप जण असतात. पण त्यांच्या नुसतंच मनात असतं. ते लोक कधीतरी ते करणार असतात ! एखादा सद्ग्रंथ वाचण्याची गरज आणि इच्छा अगदी साठीपर्यंत बाळगणारे आणि

तसं अधूनमधून म्हणून दाखवणारे नाही का भेटत आपल्याला !

मग 'विद्यार्थी' व्हायला अशांच्या ठिकाणी गरज आणि इच्छा असूनही कमी पडतात ते 'प्रयत्न', त्यासाठी कष्ट किंवा झीज सोसण्याची असलेली तयारी. उपाहारगृहात गेले तर असंख्य वेळा दोनदोनशे रुपयांची बिलं सहज देतील, पण 'ज्ञानेश्वरी'ची किंमत शंभर रुपये म्हटलं की, पुढल्या महिन्यात घेऊ म्हणतील. टीव्हीसमोर रोज तास-दोन तास सहज घालवतील, पण तासभर वाचन किंवा जप म्हटलं की, कंटाळा करतील, उद्या करूया म्हणतील. म्हणून सर्वांत महत्त्वाचा टप्पा तिसरा - झीज आणि कष्टांचा ! तो साधला की, 'विद्यार्थी' होणं जमलं.

हे सारं झालं बरंचसं लौकिक विद्यांबद्दल. त्यातून एखाद्या विशिष्ट विषयाचं-शास्त्राचं ज्ञान होतं. विद्यार्थीपणाचं सार्थक होतं. मनुष्य शिकतो तो त्याची अज्ञानाची अडचण दूर करावी, मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग करून आत्मविश्वास, यश, किर्ती, पैसा संपादन करावा आणि सुखी जीवन जगावं म्हणून. तशा विद्या असंख्य लोक मिळवतात - यश, किर्ती, पैसा असंही बरंचसं मिळवतात. पण सुख मात्र हुलकावणी देत राहातं. शाश्वत आनंद, समाधान तर यातल्या कुठल्याच विद्येनं कधीच मिळालं नाही, मिळेल असं वाटतही नाही.

मध्यंतरी एका संशोधनानं मेंदूतली सुखाची केंद्रं आणि त्यांची कार्यपद्धती शोधून काढली. त्या केंद्रांना कृत्रिम रीतीनं विद्युत्धक्के देऊन सुखाची संवेदना निर्माण करण्यापर्यंत येऊन ती विद्या थांबली. पण ते सुख, धक्के मिळत आहेत आणि वीज आहे तोवरच. पुन्हा दुःख हजरच आहे.

म्हणजे एक तर व्यसनासारखं हे कृत्रिम ठरलं तसंच तात्कालिक आणि परावलंबीही. एवढा अनुभव प्रामाणिकपणे आल्यावर माणसाला

स्वत:तल्या शाश्वत आनंदाच्या उणिवेची,गरजेची जाणीव होते. ते मिळवण्याची तीव्र इच्छाही होते. अशीच माणसं 'देवाच्या विद्यापीठा'चे विद्यार्थी होतात.

श्री गुरुदेवांनी सुचवलेलं हे देवाचं विद्यापीठ खूप विशाल, अमर्याद, अथांग आहे. त्यामुळं प्रपंचातल्या, लौकिकविद्यांतल्या पद्धतीनं एखादा मर्यादित, आखीव अभ्यास शिकून घेऊन शिक्षण पूर्ण झालं असं या विद्यापीठात समजता येत नाही. विशेषत: शिकण्याची, शिक्षण पूर्ण झाल्याची निश्चिंतता बाळगता येत नाही. अहंकार-मोठेपणा तर अजिबात मिरवता येत नाही. सतत सतर्क, नम्र राहावं लागतं.

याचं कारण असं की, त्या विद्येचा विषयही अथांग आहे. एखाद्या लौकिक शास्त्रासारखा तो मर्यादित नाही. अशी सर्व शास्त्रं, त्यांचे विषय, सारा संस्कृतीचा पसारा, इतकंच काय या दृश्य जगातल्या यच्चयावत सगळ्या वस्तू, इतकंच नव्हे तर असीम असं, साऱ्या दृश्य जगाला घडवणारं-मोडणारं-आकार देणारं अदृश्य विश्व - असा सारा शब्दांतही न मावणारा पसारा हा त्या देवाच्या विद्यापीठातला ज्ञानाचा-विद्येचा विषय आहे. मग थोडंफार कळलं तरी सारं काही कळल्यासारखं, या देवाच्या विद्यापीठात कसं वावरता येईल ?

त्या अर्थानं पाहिलं तर, या देवाच्या विद्यापीठात शिकणं, म्हणजे सुरुवातीला जगाच्या ज्ञानापेक्षासुद्धा आपल्या स्वत:च्या अंतर्विश्वाविषयी शिकणं होय. पिंडाच्या रचनेवरून ब्रह्मांडाची आणि या सर्व रचनेवरून रचनाकर्त्याची कल्पना येत जाते, ज्ञान होत जातं. हे शिकताना हेही लक्षात येतं की, हे विश्व, त्याचे सारे व्यवहार, जसे कार्यकारणभावानं बांधलेले आहेत, तसेच अनेक व्यवहार घटना कार्यकारणभावाच्या पलीकडंही आहेत. अत्यंत सूक्ष्मबुद्धी वापरली, तरल

कल्पनाशक्ती चालवली तरी माणसाला स्वत:च्या मनाचा जसा थांग लागत नाही, दुसऱ्याच्या तर सोडाच - तशी अवस्था या देवाच्या विद्यापीठातल्या ज्ञानाची आहे.

एक मात्र आहे, त्या विद्यापीठात शिकताना शिकता शिकता खरा आनंद मिळत जातो, तो कृत्रिम नाही. वर म्हटला तसा कुठल्या धक्क्यावर, कृतीवर, विजेवर अवलंबून नाही. फक्त शिकणाऱ्यानं होत जाणाऱ्या या दैवी ज्ञानाचा आनंद घेताना 'ज्ञान झाल्याचा अहंकार' कधी बाळगू नये. कारण ती बेसावधता असते. ती दु:ख निर्माण करू शकते. होणाऱ्या ज्ञानाबरोबर, न झालेल्या किंवा वेळी होऊ न शकणाऱ्या ज्ञानाबरोबर उत्सुक आणि नम्र राहावं - म्हणजेच देवाच्या विद्यापीठात सतत विद्यार्थी राहावं.

याचा प्रत्यय साध्या व्यवहारातही येतो. आयुष्यभर पक्षिनिरीक्षण करून त्यात तज्ज्ञता मिळवलेल्याला एके दिवशी सकाळी उठल्यावर आपल्याच अंगणात एक, एकदम नवा पक्षी सहज बसलेला दिसावा आणि त्याला पुन्हा विद्यार्थी बनून शिकायला लागावं, तसा प्रत्यक्ष अनुभव येतो. हीच गोष्ट माणसांच्या अचानक चांगल्या किंवा वाईट वागण्याबद्दल होऊ शकते. तीच गोष्ट देवाच्या विद्यापीठातले गुरुवर्य-कुलगुरू असणाऱ्या गुरुदेवांसारख्या संतांच्या सांगण्यातल्या एखाद्या नव्या मुद्याबद्दल होऊ शकते.

एकदा गुरुदेव सांगलीला आले असताना पूज्य काकासाहेब तुळपुळे यांच्याबरोबर एका गृहस्थांकडे गेले होते. तिथं सर्वांना देण्यासाठी बशांतून शिरा आणण्यात आला. गुरुदेव तिथून खूप लांब बसलेले होते. पण ते तिथूनच शिरा पाहून काकासाहेबांना म्हणाले, 'शिऱ्यात साखर कमी आहे, तो अगोड आहे, तुम्ही खायला हरकत नाही.' प्रत्यक्षात ते

खरं होतं.

बाकीची जवळची मंडळी चकित झाली. पण ती देवाच्या विद्यापीठातली विद्यार्थी-मंडळी होती. त्यामुळं त्यांनी काकासाहेबांना त्याबद्दल विचारलं. काकासाहेब या विद्यापीठातले गुरुवर्य. त्यांनी सांगितलं, गुरुदेव नजरेनंसुद्धा चव बघू शकतात आणि ती बरोबरही असते !

लौकिक विद्यांचा अभ्यास जरूर करावा, पण या विद्यांनी जे शाश्वत समाधान मिळत नाही, ते मिळवण्यासाठी देवाच्या विद्यापीठात अलौकिक विद्येचा अभ्यास करण्यासाठीही विद्यार्थी व्हावं, कायम विद्यार्थी राहावं आणि कायम आनंदात राहावं.

*

९.

निर्गुण नेले संदेहाने । सगुण नेले ब्रह्मज्ञाने ।
दोन्हीकडे अभिमाने । वोस केले ।।

- श्री समर्थ रामदास स्वामी

आपल्या घरातल्या खोलीत टेबलावर एखादी वस्तू ठेवलेली असते, अर्थात ती वस्तू पाहाणं यात अवघड किंवा चर्चा करण्यासारखं काहीच नाही. पण आपण ती एखाद्याला तेवढी घेऊन ये म्हणून सांगितलं. तो ती वस्तू टेबलावर नाही म्हणून परत आला. वस्तू जर त्याच जागी असेल तर आपल्याला दोन शंका येतात. एक त्या वस्तूवर पुरेसा प्रकाश नाही, म्हणून त्याला ती दिसली नाही.

दुसरी गोष्ट याच्या डोळ्यांत काही अंधार आहे - सारा असेल किंवा त्यानं नीट न पाहाण्यासारखा काही अडथळा या माणसाकडं असेल. त्यामुळं याच्या डोळ्यांत प्रकाश नाही, म्हणजे पाहाण्याची इच्छा, नीट प्रयत्न, डोळ्यांतला दोष - सारा उदा. पूर्वग्रह - म्हणजेच कुठलातरी अंधार आहे, म्हणून ती वस्तू दिसली नाही. परिणाम अर्थात एकच ती मिळाली नाही, आणता आली नाही. कार्य सिद्धीला गेलं नाही.

असा वस्तूवर असो नाहीतर डोळ्यांवर असो, एकच अंधार माणसाला कार्यात अपयश देतो. तसा एकच घटक माणसाच्या जन्माचं सार्थक घडवण्यात त्याला अपयश देतो - तो म्हणजे विविध रूपांतला त्याच्या ठिकाणचा अभिमान किंवा अहंकार होय. तो कधी डोळ्यांवरच्या

दोषांच्या रूपानं वावरून नुकसान करतो तर कधी वस्तू अंधारात ठेवून नुकसान करतो. म्हणूनच आयुष्याचं सार्थक करताना येणाऱ्या या 'अभिमाना'च्या दुर्दैवी अडथळ्याबद्दल श्री समर्थ आपल्याला या सुवचनात सावध करीत आहेत आणि ते विशेषत: सध्याच्या युगात समजून घेणं फारच गरजेचं झालं आहे.

श्री समर्थांसारखे त्यागी, अवतारी महापुरुष एखादं सत्य सांगतात तेव्हा द्रष्टेपणामुळं पुढच्या अनेक शतकांच्या मानवी भविष्याचा पट त्यांच्यासमोर असतो. आपण गेल्या काही शतकांत पाहातोच आहोत की, या वचनाचा अर्थ आणि उपयुक्तता कशी वाढली आहे. कारण गेल्या शेदोनशे वर्षांत विज्ञानाच्या प्रगतीनं निसर्गाची अनेक कोडी उलगडत चालली. मानवी शरीर, सृष्टी कळू लागली.

इतकंच नव्हे तर सूर्यमंडळ आणि त्याबाहेरच्या स्थितींचा अंदाजही लागू लागला. साहजिकच आधीची अनेक ज्ञानं जी केवळ अनुमानावर, ग्रांथिक ज्ञानावर अवलंबून होती ती ढासळली. निसर्गाची अनेक कोडी उलगडली. याचे परिणाम होऊन यंत्र युग अवतरलं. माणसाची अनेक कामं त्यानं सोपी केली. रसायनं आली, औषधविज्ञान आलं, शरीरसुखाची अपरिमित साधनं आली.

हे सारं ठीकही झालं, ते तसं आता अपरिहार्यपणे होत राहाणार, जोवर निदान विघातक व अनावश्यक संशोधनं व साधनं याबद्दल आपण सावध होत नाही तोवर. प्रश्न याचाही फारसा नाही. यातून एक वृत्ती अधिक प्रबळ झाली, ती ही की आपल्या साऱ्याच परंपरा नव्या शास्त्रांच्या व स्वत:च्या बुद्धीच्या कसोटीवर तपासायच्या आणि त्यावर त्या खऱ्या ठरल्याच पाहिजेत असा आग्रह ठेवायचा.या पद्धतीनं तपासण्यात अडचण नाही, पण तसं करताना काही गोष्टी अंधश्रद्धा ठरल्या की, सरसकट

सगळ्याच जुन्या गोष्टी अडाणीपणाच्या, चुकीच्या, भाबडेपणाच्या होत्या असं मानण्याचीही प्रवृत्ती बळावली. हे मात्र नुकसानीचं झालं.

त्यातही दुसरं हेही झालं की, ही शास्त्रं, या कसोट्या विशेषत: परकीयांनी आणल्यामुळं जे काही सत्य आहे ते त्यांनाच समजलं, आपले पूर्वज अडाणी होते असं मानण्याचीही वृत्ती झाली. या साऱ्या नव्या अंधश्रद्धा झाल्या. यांत जे चुकीचं आढळलं ते तर अगदी वैज्ञानिक दृष्टिकोनानंसुद्धा जाणं योग्यच होतं. पण जे दिसत नाही किंवा सूक्ष्म आहे किंवा अज्ञेय आहे ते जाण्यानं आपलंच नुकसान झालं, होतंही आहे.

इथं श्री समर्थांनी सांगितलेल्या वचनाच्या संदर्भात अधिक बघायचं झालं, तर साध्या भाषेत देवाची मूर्ती दगडाची होती, धातूची होती हे भान मूर्ती करणाऱ्यालाही होतं, ती करायला सांगणाऱ्या ऋषी आणि द्रष्ट्या महापुरुषांनाही होतं. तिच्यात मंत्रानं येणारं देवत्व हाही विषय क्षणभर बाजूला ठेवला तरी तिच्या दर्शनात, तिथं ठेवायच्या पवित्र वातावरणात, माणसाच्या विकार-व्यवहारानं अवनत होणाऱ्या मनाला पुन्हा उन्नत, उदात्त करण्याचं सामर्थ्य होतं.

हेच सामर्थ्य कदाचित एखाद्या झाडात, पशूत, पक्ष्यातही असेल. हे ओळखणाऱ्यांना माणसांचं मन ओळखत होतं, त्याची विकारशीलता-देहबुद्धी-स्वार्थबुद्धी त्यामुळं होणारे व्यक्तिगत व सामाजिक उद्रेक व विनाशही कळत होते. नित्याच्या अहंकारी - स्वार्थी व्यवहारी जीवनातल्या वावरामुळं मनाला येणारी मलिनता कळत होती.

ज्यांना दुसऱ्याचं मन वाचता येत होतं, त्याच्याशी तादात्म्य होता येण्याइतपत जे नि:स्वार्थी, निर्मळ व हितबुद्धीचे झाले होते त्यांना हे 'मना'चं स्थान, त्याची उपयोगिता आणि उपद्रवक्षमता कळत नव्हती, हे म्हणणं किती धाडसाचं आहे, हे समजून घ्यायला हवं.

कारण पूजेतली यांत्रिकता, करणाऱ्याची निकृष्टता, आजूबाजूचं व्यावसायिक वातावरण, त्या त्या लोकांचे लोभ-आसक्ती अशा नकारात्मक गोष्टी त्याज्य होत्या किंवा आहेत, यात दुमत असायचं कारणच नाही. पण निर्माल्य फेकताना देव टाकला जावा, तशी वातावरणाकडं बघून ते वातावरण निर्माण करणाऱ्या आपल्यासारख्याच माणसांची शंका यायच्याऐवजी देवाची अन् देवाच्या उपयुक्ततेची किंवा सगुणाची कल्पना मांडणाऱ्यांचीच शंका येऊन देवच फेकावा वाटू लागला. इतकंच काय, त्यात आपण फार मोठा वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगतो आहोत, बुद्धिनिष्ठ आहोत, याचा अहंकार व धन्यता वाटू लागली. यांतलं नुकसान उघड आहे.

आता ब्रह्मज्ञानापोटी 'सगुण'देव कसा गेला, ते पाहू. शास्त्रज्ञानाच्या विस्तारामुळं काही थोडं सूक्ष्म अणूपरमाणूंचं ज्ञान हाती आलं. तसंच जे ब्रह्मज्ञानाच्या अभ्यासाला लागले त्यांना ब्रह्म किंवा परमात्मा सूक्ष्म आहे, हे कळलं. मूर्ती दगड दिसू लागली. ज्ञानं म्हणून ही प्रगती उत्तम असली तरी माणसांना भावबळ देणारी, अंतरंग हालवणारी, सात्त्विकता जागवणारी, जोपासणारी सगुण देवाची उपासना या तथाकथित दोन्ही 'ज्ञानी' वर्गांना अडाणीपणा, अपरिपक्वता वाटू लागली. सगुणोपासना करणारे बावळट, मागासलेले वाटू लागले. स्वत:ला तर सगुणोपासनेचे लाभ अंतरले.

बरं, या 'ज्ञानी'पणामुळं विवेकानं आणि निरिच्छतेनं वागणं आवश्यक होतं. त्यानं तरी ज्ञानरूप भगवंत जवळ आला असता. पण तेवढी प्रामाणिकता आणि मनाचा निश्चय नव्हता, त्यामुळं तसं वागणंही कठीण होतं.

अशा रीतीनं या 'ज्ञाना'चा अहंभाव तेवढा उरला. ज्यांना अगदी

थोड्यांना विवेक जमला त्यांच्याही जीवनाला कठोरता, भावशून्यता आली.

कारण नुसता 'विवेक'सुद्धा भावांच्या अभावी कोरडा असतो. आता हे ज्यांच्या उशीरा का होईना लक्षात आलं, त्यांना या ब्रह्मज्ञानामुळं मूर्तीत देव पाहाणं आणि स्वत:चं उन्नयन साधणं दुरपास्त झालं. एकूण या बाजूनं ब्रह्मज्ञानानं सगुण आणि त्यामुळं मिळणारा आनंद गमावला.

तेच दुसऱ्या बाजूला निर्गुण परमात्माही 'संदेहा'नं कसा गमावला, ते पाहू. सगुण देव निदान समोर दिसणारा तरी आहे. निर्गुण परमात्मा कितीही अंतिम आणि खरा असला तरी तो निर्गुणच होता. त्यामुळं माणसाच्या कुठल्याच इंद्रियाच्या पकडीत तो येत नव्हता. कधी येणारही नाही. तो साधा दिसत नाही, एवढ्यापोटी त्याच्याबद्दल शंका निर्माण झाली.

परमात्मा दिसत नाही, ऐकू येत नाही, ना चव, ना रंग, ना रूप, ना वास. त्याच्यावर, त्याच्या अस्तित्वावर विश्वास कसा ठेवायचा हा संदेह निर्माण झाला. वैज्ञानिक, शास्त्रीय, ज्ञानदृष्ट्या हे बरोबरच होतं. पण त्यामुळं निर्गुण, सर्वत्र भरलेला परमात्मा आणि त्याचा आनंदही या 'संदेहानं' गमावला. स्वत:च्या बुद्धीच्या अहंकारामुळं निर्गुणाबद्दलच्या शंकांना अंत कधीच येत नाही. तेच झालं आणि पुन्हा एकदा अभिमानानं, अहंकारानं भगवंत गमावला.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं, देव अनुभवताही येईना किंवा मानताही येईना. त्यामुळं सगुणही गेलं नि निर्गुणही अंतरलं. एकूण आनंदाचा, स्वास्थ्याचा, शांतीचा, समाधानाचा, परमेश्वराचा दुष्काळ झाला. तोसुद्धा दोन्हीकडं या एकाच अहंकारानं, अहंकाररूपी अंधारानं.

सगुणाची पूजा करताना 'मी' ब्रह्मज्ञानी झाल्यानं आड आला आणि निर्गुण मानताना 'मी' शंकाग्रस्त झाल्यानं आड आला.

म्हणून या अंधकारासारख्या 'अहंकारा'विरुद्ध लढाईच खरी लढाई आहे, हे ओळखून ती केली तर आपापल्या कुवतीप्रमाणं सगुण तरी हाती राहील नाहीतर निर्गुण तरी किंवा दोन्हीही - आणि कसंही झालं तरी 'आनंद'च राहील, हा श्री समर्थांचा भावार्थ लक्षात घेऊन जगावं, हे बरं !

*

१०.

सर्वथा संयमी जीवन ।
तयासी नाव धर्माचरण ।।

- स्वामी स्वरूपानन्द

अलीकडं धर्म आणि धर्म या शब्दांशी संबंधित बऱ्याच विषयांच्या चर्चा ऐकू येतात. धर्म कालबाह्य म्हणणं असो, तो सनातन म्हणणं असो, ती अफूची गोळी म्हणोत, कुणी तो अडाणीपणा म्हणो, कुणी तो समाजधारणेसाठी अत्यावश्यक समजो, कुणी तो व्यक्तिगत विषय म्हणो तर कुणी विवाद्य विषय म्हणून बाजूला ठेवो. आपणही कदाचित यांतली काही मतं बाळगीत असू, त्याचा हिरीरीनं पुरस्कार करीत असू, कधी त्याचा प्रचार-प्रसारही करीत असू.

आपल्या हे सहज लक्षात येऊ शकेल की, या साऱ्या मतमतांतरांत दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे आधी सांगितली ती बहुतांश मतं ही कुठल्या ना कुठल्या प्रचलित धर्माशी निगडित असतात. सर्वसाधारण सर्वच धर्माबद्दल अशी मतं, त्या त्या धर्मांचे पाईक आणि विरोधक, तसंच या कुठल्याच धर्मापासून स्वत:ला वेगळं ठेवू पाहाणाऱ्या लोकांतली ही मतमतांतरं असतात. त्यांतले विरोध समजून येण्यासारखे असतात.

दुसरी महत्त्वाची गोष्ट आहे, ती आचरणाशी निगडित असते. धर्मसुद्धा कुठल्या तरी मौखिक, लिखित शब्दांवर, आचरणाच्या

तत्त्वांवर आधारलेला असतो. मग त्या शब्दांचा उगम ज्ञात असो वा अज्ञात असो किंवा मानवी असो वा दैवी असो. साऱ्याच धर्मांची - मग हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध, जैन, झोरोष्ट्रियन इ. - कुठल्याही धर्मांच्या अशा मूळ तत्त्वाकडं लक्ष वेधलं जाणं ही खरी गरजेची गोष्ट आहे. नुसतीच ही तत्त्वं माहिती असून,पाठ असून,प्रचार करून,लोकांना पटवून या तत्त्वांचं खरं उद्दिष्ट साध्य होणार नाही, हे अगदी उघड सत्य आहे.

या दोनही दृष्टींनी आजच्याच नव्हे तर अनादी काळापासून चाललेल्या चर्चांचा विचार केला तर हे लक्षात येईल की, माणसाचं व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन खऱ्या अर्थानं अंतर्बाह्य समृद्ध, समाधानी बनवणं हे समान ध्येय अशा कितीही धर्मांची शाश्वत तत्त्वं अभ्यासली तरी त्यांच्या बुडाशी आहे. त्या ध्येयासाठी सांगितलेल्या तत्त्वांत फार मोठं साम्य जे जागतिक पातळीवर आढळतं त्याचं कारणही तेच आहे.

बाकी मग त्या त्या काळाचे काही सामाजिक सुरक्षिततेचे प्रश्न, त्या त्या भौगोलिक-प्रादेशिक वैशिष्ट्यांमुळं निर्माण झालेले प्रश्न, काही विशिष्ट काळात उद्‌भवलेल्या वैयक्तिक-सामाजिक-राजकीय समस्या - अशांसाठी त्या त्या काळांपुरते अंतर्भूत झालेले आचार किंवा तत्त्वं हा खरं तर बाजूला करण्यासारखाच नव्हे तर बाजूला करण्याजोगाच भाग आहे, हे आपण समजू शकतो.

ते जर सोडलं तर राहणाऱ्या तत्त्वांतलं साम्य पाहिलं, त्यांतूनही विविध धर्मांतल्या मूलभूत-गाभ्याच्या-अपरिहार्य अशा तत्त्वांना आपण आलो तर जी काही तत्त्वं राहातात ती तर तत्त्वं म्हणून अपरिहार्य असतातच,पण त्यांचं नुसतं मनन करून उपयोग नाही, ती पुन्हा आचरणाच्या मुशीतून निघतील तर मनुष्यत्वाचं, समाधानाचं शुद्ध सोनं घेऊन बाहेर पडतील,

हे निर्विवाद. ही तत्त्वं कुठल्या धर्मपंथाच्या चौकटीत बसवण्यापेक्षा नक्कीच थोर असतात, साऱ्या जगाला मार्गदर्शक ठरणारी असतात.

असंच एक सारभूत तत्त्व 'सर्वथा संयमी जीवन । तयासी नाव धर्माचरण ।' या पूज्य स्वामी स्वरूपानंदांच्या अनमोल वचनात आलं आहे. मी नुसता कुठल्या जन्माला आलो किंवा कुठला धर्म स्वीकारला म्हणून त्या धर्माचा 'अनुयायी' बनत नाही. तो मी खऱ्या, मूलभूत, शाश्वत तत्त्वांच्या आचरणानं धार्मिक बनतो. मग या आचरणाला धर्माचरण म्हणता येईल. असं एक खरं धर्माचरण कोणतं ते वचनात पूज्य स्वामीजी सांगत आहेत.

या वचनाचं वैशिष्ट्य हे की, साध्यासाध्या व्यवहारापासून प्रत्यक्ष अध्यात्मापर्यंत त्याची व्याप्ती पसरलेली आहे. मुळात धर्म हा व्यक्तित्वाचे सर्व घटक सुसंघटित करून, कार्यशील करून त्यांचं आणि मानव समाजाचं कल्याण साधून देणारा आचरणतत्त्वांचा संचच असतो. त्यामुळं त्यात अनेक तत्त्वं आणि तीही आपापल्या परीनं श्रेष्ठ असतात. कृतज्ञताही श्रेष्ठ, परोपकारही श्रेष्ठ, दयाही श्रेष्ठ. आता कधी त्यांचं आचरण करताना शंका उद्‌भवू शकते. शरणागतावरची दया आणि एखाद्या क्रूरकर्म्यावरची दया असे प्रश्न आचरण करताना पडतात.

स्वामीजींनी सांगितलेल्या या 'संयम'गुणाचं, संयमतत्त्वाचं वैशिष्ट्य हेही आहे की, धर्माच्या अशा वेगवेगळ्या तत्त्वांत शंका उत्पन्न करणारे क्वचित विरोधाभास, मतभेद उत्पन्न करणारे प्रश्नही हे तत्त्व सोडवतं आणि त्यांत व्यवहार्यता, व्यवस्था व हित साधू शकतं. इथं ते म्हणेल, 'दयासुद्धा संयमानं दाखवा.'

आपल्या रोजच्या व्यवहारात साधी शरीरयंत्रणासुद्धा आदर्शपणे चालते, ती तिच्याशी निगडित असलेलं आपलं आचरण 'संयमपूर्ण'

असतं तेव्हाच. मानवी शरीररचनेनं जगण्यासाठी, धारणेसाठी काय, कसं आणि किती खावं या साऱ्यावर कितीही तपशिलानं एखादा आरोग्यशास्त्री सांगू शकेल. पण थोडक्यात सांगायला 'संयम' हा एक गुणसुद्धा पुरतो. मानवी पचनसंस्था जे पचवू शकते, जे तिला योग्य व आवश्यक आहे ते खातानासुद्धा 'संयम'च उपयोगी पडेल. योग्य आहे म्हणून जास्ती, अवेळी चालत नाही. त्यानं सर्वांचंच स्वास्थ्य बिघडतं.

तीच गोष्ट इंद्रियांच्या आहार-विहाराची आहे. डोळे पाहाण्यासाठी, ज्ञानप्राप्तीसाठी गरजेचेच. संयमानं पाहील तर डोळेही कार्यक्षम राहतील, टिकतील, कार्यही साध्य होईल. तेच कानाचं, तेच जिभेचं, तेच पायाचं. हातपाय वापरण्यानं तर स्वत:चंच नव्हे तर इतरांचंही जीवन घडेल.

पण म्हणून ते वापरताना 'संयम' गेला की, हात अति किंवा चुकीची कर्मं करायला तयार असतात, पाय अति आणि भलतीकडंच न्यायला कारणीभूत ठरतात. बरं त्यांना त्रास नको म्हणून ते मोकळे, काम न देता ठेवावेत तरीही 'संयम' गेलाच. हातपाय आखडून जातील, असून निकामी होतील.

जी गोष्ट या साध्या शरीराची तीच मन-बुद्धी-विचार-कल्पनांची आहे. साधं घर बांधायची कल्पना निवाऱ्यासाठी गरजेचीच होय. ती वापरली तर गरजा पुऱ्या होतील, सोयी होतील असं घर ठरवता येईल, बांधता येईल. ती गरज संपल्यावरही कल्पना 'संयम' सोडील तर पुन्हा कर्जवेच करून, आयुष्याचा मोलाचा वेळ घालवून अजून दोनचार घरं बांधील आणि मग त्यांच्या काळजीत राहील, स्वास्थ्य घालवील.

बुद्धी तर माणसाचं विशेष शस्त्र. चालवणं गरजेचंही. व्यवस्थित वापरली तर प्रपंच तर व्यवस्थित चालवीलच, पण जीवनाला भगवंताचं ध्येय देईल, गाठायला साधनेचं अधिष्ठान देईल. पण तिच्या वापरातला

'संयम' सुटला तर प्रत्येक गोष्टीत अन् पावलोपावली चिकित्सा करील, तर्कटं करील, मग सतत संशय-अशांतता निर्माण होईल. जीवनाच्या सुंदर संधीचं भयाण अनुभवात रूपांतर करील. म्हणून पुन्हा लागेल तो 'संयम'च.

आपण विचार करीत जाऊ तसं या 'संयमा'नं आपलं जीवन किती अर्थपूर्ण आणि स्वास्थ्याचं होऊ शकतं, याची कल्पना येते. त्याच बरोबर आजूबाजूला पाहिलं तरी सर्वत्र पसरलेला हिंसाचार, बोकाळलेले भ्रष्टाचार, अवाजवी संपत्तीचे ढीग, अनास्था - अशा अगणित गोष्टींचं मूळ हे 'संयमा'चं धर्माचरण कुठंतरी बिघडल्याचेच पुरावे देतील.

आधी म्हटल्याप्रमाणं आजकालचे प्रचलित धर्म किंवा त्यांचे कट्टर अनुयायी यांच्यातला अतिरेकीपणा, हिंसावृत्ती, सक्तीची धर्मांतरं हीसुद्धा सारी दाखवतात ते प्रचलित धर्मपालनातलं 'संयमा'चं सार्वत्रिक तत्त्व विसरल्याचं लक्षण. त्यामुळं या जुन्यांचा धर्माचरणातला 'असंयम -अतिरेकीपणा-अविचार' पाहिला की, धर्मच नको किंवा त्यापासून लांब राहिलेलं बरं, अशा प्रतिक्रिया नवनव्या पिढीत का उमटतात त्याचीही कारणं कळू शकतात. धर्म आपापल्या परीनं मुळात चांगले असूनही असं होतं.

थोडंसं पुढं जाऊन हेही म्हणता येईल की, 'सर्व बाजूंनी, सर्व अर्थांनी संयमी जीवन' जर कोणताही माणूस जगेल तर तो कोणत्याही धर्माचा असला तरीही सर्व धर्मांना प्रिय राहील, सर्व माणसांच्या कल्याणाचा ठरेल आणि स्वत:ही उद्धरून जाईल.

अशा धर्माचरणाला कुठल्या विशिष्ट धर्माचं नाव देण्याचीसुद्धा गरज उरणार नाही. तो सर्व मानवजातीच्याच नव्हे तर साऱ्या इतर सृष्टीच्याही कल्याणाचा धर्म असेल.

*

११.

दैनिक इच्छांपलीकडे वाढ होणे हे पूर्वायुष्यात घडले पाहिजे.

- श्री निसर्गदत्त महाराज

एखादं लहान बाळ आपण पाहातो. त्याला तहान लागली तरी ते रडतं, भूक लागली तरी रडतं आणि थंडीवारा लागू लागला तरी रडतं. दूधपाणी, दुपटं काय ते मिळेपर्यंत अस्वस्थ राहातं. त्या त्या गोष्टी मिळाल्या की शांत होतं, पडून राहातं, झोपी जातं.

एखादा चाळिशीचा प्रौढ माणूस आपण पाहातो. त्यालाही देहाच्या गरजा निर्माण होतात. भूक-तहान सहन होत नाही. आता तो प्रौढ असल्यामुळं तो म्हणायच्या आधीच इतरांना त्याच्या वेळा, त्याच्या गरजा सांभाळाव्या लागतात. त्या न सांभाळल्या तर तोही आरडाओरडा करतो, उपद्रव निर्माण करतो, भांडूतंडू लागतो.

तसाच एखादा वयोवृद्ध मनुष्य आपण पाहातो. त्याला अशीच तहानभूक लागते. सहन होत नाही. कुणी लक्ष दिलं नाही की, आरडाओरडा करतो, रुसतो, फुगतो, चिडचीड करतो. आश्चर्य हे की, वयात एवढे फरक असूनही प्रतिक्रियांत फारसा फरक नसतो.

तशीच गोष्ट मनासारखं होण्याची असते. स्वत:ला महत्त्व-मान-ओळख प्राप्त होण्याची असते. शाळकरी मुलालासुद्धा त्याच्या मनासारखं वागणारे आवडतात. प्रौढालाही अन् वृद्धालाही. कुणी मनाविरुद्ध

केलं, ते करणं बरोबर असलं, ते वागणं सत्य असलं तरी मुलगाही चिडतो, प्रौढही, वृद्धही.

हेच या साऱ्या गोष्टींसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांच्या बाबतीत असतं. लहान मूल भूक लागल्यावर रडतं हा त्याचा भूक कळवण्याचा नि पुरी करण्याचा प्रयत्नच असतो.प्रौढ ताबडतोब जेवायला वाढायची ऑर्डर सोडतो, त्यासाठी बाहेर कष्ट करून, पैसे मिळवतो, धान्यबाजार आणतो. वृद्ध स्वत:च्या जेवणाच्या वेळा चुकू देत नाही. प्रकृतीच्या अपरिहार्य गरजा सोडल्या तरी इतर बाबतीत आग्रह, चवी, आवडीनिवडी - हे सारं तसंच असतं.आता करणं ताब्यात नसतं,स्वयंपाकघर ताब्यात नसतं,म्हणून तोही आरडाओरडा करतो - हा त्याचा निकराचा प्रयत्न असतो.

साधारण पंचविशीपर्यंतचं आयुष्य पाहिलं तर तहान-भूक-निवारे-वस्त्र प्रावरणं-मौज-मनोरंजन-बाहेर फिरणं-खाणीपिणी करणं - हे सर्व करता यावं म्हणून व्यवसायनोकरीचे कष्ट, अशा स्वरूपाचंच आयुष्य अनेक ठिकाणी सामान्यपणे आढळेल. हे पंचविशीपर्यंतचं आयुष्य पुढं पन्नाशी किंवा सत्तरीपर्यंत आढळतं. हे धक्कादायक किंवा विचार करण्यासारखं नाही का ?

कारण असं की, मानवी क्षमता इतकी विलक्षण आहे की, तोच पंचविशीतला माणूस अर्धपोटी राहून एखादा शास्त्राभ्यास करून जगाला उपयोगी पडणारी तपश्चर्या करू शकतो, दुसऱ्या एखाद्या गरजूला अर्धी भाकरी देऊ शकतो, कुणा दुसऱ्या गरजू विद्यार्थ्याला शिकवू शकतो, कुठल्या सामाजिक चळवळीत नि:स्वार्थपणे राबू शकतो. पुढं तर ही क्षमता अधिक वाढलेली असते. ज्ञान, शक्ती, अनुभव, दानाची क्षमता अशा असंख्य गोष्टी स्वत:जवळ साठलेल्या असतात. प्रौढपणी अशा दुसऱ्यातिसऱ्याच नव्हे असंख्य लोकांसाठी, समाजासाठी देण्यासारख्या,

करण्यासारख्या इतक्या क्षमता आणि संधी असतात की, जिण्याचं सोनं व्हावं.

पण स्वत:च्या इच्छा पुऱ्या करण्यासाठी सतत धडपड करण्यापलीकडं विकास जर घडलाच नसेल तर असा प्रौढ काय अन् वृद्ध काय. जवळच्या पैशाच्या अनुकूलतेप्रमाणं हॉटेलिंग करीत राहील, तीन तारांकित, पंचतारांकित ठिकाणी जाऊन मौजमजा करील, देहाची सुखं पुरी करील, पायाला भिंगरी लावून पर्यटनं करील, अधिक पैसा असेल तर विमानानं जग पालथं घालील.

यांतली कदाचित काही गरजेची सुट्टी, बदल एवढं सोडलं तर स्वत:च्या दैनिक इच्छा पूर्ण करण्याची लहानपणचीच पुढची पुढची आवृत्ती निघण्यापलीकडं जगण्याला अर्थ तो कुठला ? स्वत:च्या तहान-भूक-रंजनं-देहसुखं यांच्या सतत वाढत्या इच्छा पुऱ्या करताकरता एक दिवस काळ घेऊन जाईल, यापेक्षा काय घडेल ? यात 'ना मनुष्यत्वाचं चीज, ना जगावर उपकार, ना ईश्वराला मदत.' सार्थक मोजायला, मापात टाकायला कुठले दाणेच नाहीत तर काय मोजावं ?

म्हणून आपल्या मोलाच्या वचनात श्री निसर्गदत्त महाराज म्हणतात की, 'दैनिक इच्छांपलीकडे वाढ होणे पूर्वायुष्यात घडले पाहिजे.' सामान्य देहगरजा आणि स्वसुखाच्या सर्व इच्छांची कल्पना जर शिक्षणाच्या वयातच माणसाला आली तर त्याचा मनुष्य म्हणून खऱ्या अर्थानं विकास व्हायला केवढी मदत होईल.

कारण अनेकदा असंही आढळतं की, अशा तऱ्हेनं 'दैनिक इच्छांपलीकडं जाण्याची' कल्पना मुळात ज्यांनी संस्कार करायचे त्या मोठ्यांनाच दुर्दैवानं नसते. त्यामुळं ती नव्या पिढीला येत नाही. मोठी पिढी तसं जगताना कुठं दिसली नाही, तर त्यांना या विषयाचं महत्त्व

आणि उपयोग कसा वाटेल ? मग फक्त स्वत:च्या स्वार्थाला आणि देहसुखांना तत्पर समाज निर्माण होणं ओघानंच येतं.

म्हणून आपल्या दैनिक इच्छा कोणत्या, त्यांच्या पूर्तीचं स्थान केवढं, त्यापलीकडं असलेले समाजोपयोगी अभ्यास, संशोधनं, कामं, इतरांच्या स्वास्थ्यासाठी बाळगायची पथ्यं कोणती, सेवेच्या व्यक्तिगत, सामाजिक गरजा आणि त्यासाठी कष्टांची, झीज सोसण्याची उपयुक्तता-संधी-त्यांतल्या सावधगिरी कोणत्या, आत्मदर्शनाची इच्छा म्हणजे काय, तिच्यासाठी स्वत:ला कोणते प्रयत्न करणं कसं व का आवश्यक आहे, त्याचे स्वत:ला आणि समाजाला असलेले उपयोग कोणते - अशा असंख्य विषयांचा आणि इच्छांचा परिचय जर शाळेच्या निदान महाविद्यालयीन वयात, निदान युवावस्थेत झाला तर त्या व्यक्तीचं आयुष्य किती सुंदर घडेल, सार्थकाचं ठरेल, समाजाचं स्वास्थ्य ते कसं घडवील-वाढवील ते समोर येऊ शकतं.

आणि मग श्री निसर्गदत्त म्हणतात, त्याप्रमाणं दैनिक इच्छांपलीकडं आपली किंवा कुणाचीही वाढ त्याच्यात्याच्या पूर्वायुष्यात घडण्याचं महत्त्व कळेल, निदान आपण तरी ते अंमलात आणून आपलं जीवन सुंदर करू शकू, समाजाला उपयोगी ठरू शकू आणि ईश्वरालाही प्रिय होऊ शकू.

*

१२.

दर वर्षी वाढदिवसाला एक एक अवगुण सोडून देत जा आणि एक एक सद्‌गुण वाढवीत जा. असे केल्यास देवळात जावयास नको.

- पूज्य श्री गणोरे बाबा

वाढदिवसाचं महत्त्व प्रत्येकाला पूर्वीपासून आहे. इतरांना ते असावं असंही वाटत आलं आहे. त्यामुळं कुठल्या ना कुठल्या स्वरूपात वाढदिवस 'साजरा' करण्याकडं प्रत्येकाचा कल असतो. थोडा काळाचा फरक सोडला तर या वाढदिवस साजरा करण्याच्या कल्पना सर्वांनी एकत्र येणं, खाण्याचे नवनवे पदार्थ करणं, ओवाळणं, भेटी-वस्तू देणं - अशा स्वरूपाच्या असतात. हे आपण जाणतोच.

त्यात काळानं थोडी नाटकसिनेमा, मनोरंजनं यांची भर घातली. पण वाढदिवसाची गोष्ट सर्वांना लागू असूनसुद्धा वाढदिवसाची मजल काही फारशी पुढं जात नाही. परंपरेनं काहींकडं मार्कंडेयपूजन किंवा इष्टदेवतांचं पूजन अशा काही गोष्टीही आढळतात, एवढंच.

या साऱ्या सध्याच्या पार्श्वभूमीवर आपलं वरील सुवचन सांगण्यापूर्वी आपल्याला सावधान करून पूज्य गणोरे महाराज म्हणतात, 'प्रत्येक वाढदिवशी खऱ्या अर्थानं पाहिलं, तर आपलं जगातलं आयुष्य

घटत असतं. तेव्हा वाढदिवसाच्या दिवशी कशात वाढ करायची व कशात कपात करायची याचा विचार करा.' हा सल्ला आपण सर्वांनीच सावध होऊन घेण्यासारखा आहे. आयुष्य कमी होतं आहे, ही जाणीव होणं गरजेचं आहेच, पण त्यामुळं नुसती खंत करीत राहाणंही बरोबर नाही आणि निराश होण्याची आवश्यकताही नाही. योग्य कृती करण्याची गरज आहे. त्या कृतीसाठी एक साधा सोपा सल्ला पूज्य बाबांच्या वचनातून मिळतो आहे. हा सल्ला व्यवहारापरी व्यवहाराला लागू आहे, परमार्थापरी परमार्थाला लागू आहे.

फक्त हा सल्ला वरवर वाटतो इतका साधा नाही, सोपा नाही, हे सुरुवातीलाच लक्षात ठेवलेलं बरं. एक संकल्प म्हणून विचार केला, तर अवगुण कमी करण्याचा संकल्प करण्यात सुरुवातीलाच असलेली सर्वांत मोठी अडचण मानसशास्त्रीय आहे. आपल्याला स्वत:ला खूप चांगलं समजण्याची आणि दाखवण्याची उपजत सवय आहे. त्यामुळं आपण अवगुणी आहोत हेच मुळात मान्य करायला कुणाचं मन सहसा तयार होत नाही. आतून स्वत:ला ओळखण्याची उत्तम यंत्रणा असूनही अवगुण लक्षात आले, तरी ते सुधारण्याच्या कष्टांपेक्षा नाकारण्याची लालूच मनाला मोह घालते.

त्यामुळं अशा वेळी 'माझे मज, कळो येती अवगुण। काय करू मन अनावर' किंवा 'मी अवगुणी, अन्यायी। किती म्हणोन सांगो काई' म्हणणारे श्री तुकोबाराय किंवा 'कपटी, पापी, अन्यायी, कुटिल बहु' असं स्वत:ला म्हणणारे श्री प्रभु - मनाच्या प्रामाणिकतेच्या, आत्मपरीक्षणाच्या किती उंचीच्या टप्प्यावर राहातात, याची थोडी कल्पना हा संकल्प केला तरी पहिल्याच टप्प्यात येते.

अवगुण मान्य होण्याच्या पहिल्या टप्प्यातच अनेकांना या

संकल्पाची उपयुक्तता आणि त्याच बरोबर अवघडपणाही लक्षात येऊ शकेल. सामान्य बेसावध माणसाची अवस्था ही एखाद्या घोरणाऱ्या आणि इतरांची झोप उडवणाऱ्या माणसानं 'मला तर झोपसुद्धा येत नाही' म्हणून घोरणं मान्य करणं नाकारावं, तशी असते.

लोक रागीट माणसाच्या रागानं त्रस्त असले, तरी असा माणूस ते मान्य करून तो अवगुण दूर करण्याऐवजी 'व्यवहारात थोडा दरारा लागतोच' म्हणून स्वत:ची तारीफच करायला लागावा, तशी अवस्था माणसाच्या मनाची या अवगुणांच्या बाबतीत असते. म्हणून हा संकल्प खरोखर करायचा ठरवला, तर पहिल्याच टप्प्यावर आपल्या मनाची कल्पना आपल्यालाच आणून देणारा आहे. सावध झालो तर अर्थातच फार चांगल्या विधायक दिशेला जीवन नेणाराही आहे.

अवगुण तो अवगुण म्हणून एकदा लक्षात आल्यावर कुठल्याही प्रकारे त्याचं समर्थन न करणं हा पुढचा टप्पा. त्यात - स्वभाव म्हणजे असं थोडं असणारंच, इतर कितीतरी लोक असे आहेतच की, लोकांचं आम्ही समजून घेतो, त्यांनी नको का थोडं समजून घ्यायला, इतरांच्यामुळं मला तसं वागावं लागतं, लहानपणापासून आमच्यावर तसे संस्कारच झाले त्याला आम्ही तरी काय करणार, आमच्या प्रारब्धातच हा अवगुण असला तर आमचं तरी त्याच्यापुढं काय चालणार - असल्या कुठल्याही मार्गानं मन माणसाला अशा सत्यसंकल्पापासून परावृत्त करायला टपलेलं असतं, हे सावधपणे ओळखून, समर्थन टाळून अवगुण कमी करण्याचे प्रयत्न निर्धारानं सुरू ठेवणं गरजेचं आहे.

याच टप्प्यावर या प्रयत्नांतलं सातत्य आणि त्यासाठी आढावा घेणंही विचारात घेता येईल. कारण अनेकदा अशा बाबतीत आरंभशूरपणा हाही स्वभावात असल्यामुळं एक तारखेचा संकल्प पाच तारखेपर्यंत

हळूहळू विसरून जाण्याचीसुद्धा भीती असते. दरवर्षी एकतीस डिसेंबर किंवा एक जानेवारीला केलेल्या संकल्पांची एक फेब्रुवारीपर्यंत कायकाय परिस्थिती झाली होती, याची आपली आपण आठवण ठेवली, तर पूज्य बाबांनी सुचवलेल्या या वाढदिवसाच्या संकल्पाच्या अंमलबजावणीत तसं होणार नाही, याची दक्षता घेता येईल.

जी काळजी अवगुण सोडण्याच्या प्रयत्नात तीच थोडीफार सद्‌गुणांच्या जोपासनेच्या दुसऱ्या संकल्पातही. तिथंही मनाशी सातत्य, धीर अशा अनेक पातळ्यांवर सावधतेची गरज आहे. पण सद्‌गुणांच्या जीवनाच्या सुंदरतेची, त्यामुळं येणाऱ्या निर्मळ, खऱ्या आनंदाची एकदा कल्पना मनात आली की, मग ही सद्‌गुणांची जोपासना सोपीही होऊ शकते.

यातही पुन्हा एक सांगड चांगली आहे आणि हे संकल्प अंमलात आणायला उपयुक्तही आहे. ती अशी की, स्वभावाच्या एकाच सूत्रात अवगुण-सद्‌गुण अनेकदा जोडलेले असतात. त्यामुळं एकाचा त्याग करताना दुसऱ्याची जोपासना आपोआप सोपी होऊन जाते. हे लक्षात घेणाऱ्याचं आणि करणाऱ्याचं कसब आहे.

म्हणजे असं की, अकारण बोलणं हा अवगुण स्वभावाच्या ज्या एका टोकाला असतो, त्याच्याच दुसऱ्या टोकाला मौनाचा सुंदर सद्‌गुण वास करतो. त्यामुळं अकारण बोलण्याचा अवगुण टाकताना मौनाच्या सद्‌गुणाची वाढ आपोआप होते, निदान सोपी होऊन जाते.

या वचनाचा उत्तरार्ध तर पूज्य गणोरेबाबांच्या देवत्वाच्या, देवळाच्या संकल्पनेवर फारच उत्तम प्रकाश टाकतो. मंदिरं, देवळं यात जायचं ते मनाची सात्त्विकता जोपासायला मदत व्हावी म्हणून, आपल्याला त्या जोपासनेत बळ मिळावं म्हणून. ते काम अनेकदा अनेक ठिकाणी

बाजूलाच असतं. इतर बाह्य उपचारात अन् दर्शनातच माणूस गुंगून जाऊ शकतो.

पण खऱ्या अर्थानं देवळात जाणाऱ्यालासुद्धा जे देवळात जाऊन साधायचं ते अशा वाढदिवसाच्या खऱ्या संकल्पानं घरीदारी साधता आलं, तर मग वेगळं देवळातसुद्धा जायला नको, असं म्हणण्यातली मार्मिकताही लक्षात घेण्यासारखी आहे. तिचा उपयोग सध्या खऱ्या अर्थानं 'देवळात जाण्या'साठीही आहे आणि स्वत:त विधायक बदल घडवण्याचं ध्येय लक्षात घेण्यासाठीही आहे.

पूज्य गणोरेबाबांनी दिलेला हा साधासोपा सल्ला प्रत्येक वयाच्या, प्रत्येक क्षेत्रातल्या माणसाचा वाढदिवस खऱ्या अर्थानं वाढदिवस म्हणून स्वत:ला आणि इतरांनाही स्वास्थ्य व आनंद देणारा आणि आयुष्याचं सार्थक करणारा ठरू शकेल !

*

१३.

'बना' ठेवि रे धैर्य सर्व बघ धीराने होई ।
माळी शिंपित बाग उचित ऋतु येता फळ येई ।।
- श्री रणछोडदासजी महाराज

गुजरातमधील थोर संत श्री रणछोडदासजी महाराज यांचं हे वचन साधकांना आणि प्रापंचिकांनाही तितकंच मोलाचं आणि नित्य उपयोगी पडणारं आहे. साधा शाळकरी मुलगा जरी झाला तरी एखाद्या परीक्षेत यश मिळवणं, स्पर्धेत-खेळात विजय मिळवणं, एखादी वक्तृत्वासारखी कला संपादन करणं अशी त्याची काही ध्येयं असतात. ती त्याच्या विकासासाठी आवश्यकही असतात. त्या दृष्टीनं तो मेहनत घेतो, काही वेळापत्रक ठरवतो, मार्गदर्शन घेतो.

त्यानं कष्टांची मनाशी केलेली काहीएक कल्पना असते. ती पुरी झाली की, त्याला वाटतं की ती ती गोष्ट आपल्याला मिळावी, साध्य व्हावी. पण या अनेक गोष्टी अशा असतात की, त्यांत कष्टाचं नुसतं एखादं गणित मांडून पुरत नाही. त्यात अनेक गोष्टी येतात. पण यशाच्या बाबतीतल्या अपेक्षा आणि अधीरता वाढत जातात. ते न आलं की, नैराश्य येतं. अनेकदा कुणालातरी दोष दिला जातो. प्रयत्न सोडून दिले जातात.

एखाद्या कसलेल्या व्याख्यात्याचं व्याख्यान झालं की, ऐकणाऱ्याला वाटतं हे आपल्याला असंच जमावं. पण त्याला वक्त्यानं

पूर्वी घेतलेल्या मेहनतींची, यशापयशांची, व्यासंगाची आपल्याला क्वचित कल्पना असते. मग विद्यार्थी भाषण पाठ करायला लागतो. म्हणून दाखवतो. काही तंत्रमंत्र जमतात. थोडंफार यश येतं. पण ते 'तसं' जमत नाही. यानं सारखी आतून निराशा वाटते. अनेकांना तर त्याबद्दल स्वत:चा रागही येतो.

हीच गोष्ट गाण्यांसारख्या अनेक कलांच्याबाबत असते. कुणीतरी मैफल रंगवून जातो आणि ते ऐकलेला, 'सारेगम'चा सराव सुरू करतो. हे चांगलं असलं तरी त्याला वाटतं चारसहा महिन्यांत ते आपल्याला यावं, इतकंच नव्हे लोकांनीही आपल्याला बोलवावं, मान द्यावा. पण असं घडण्याइतकं ते सोपं कधीच नसतं. त्या कसलेल्या वक्त्यानं अभ्यासलेले हजारो ग्रंथ आपल्याला परिचितसुद्धा नसतात, गायकानं नुसत्या षड्ज कमावण्यावर घेतलेली मेहनत आपल्या गावीही नसते. मग ते फळ,ती मांडणी कशी जमावी ?

आश्चर्य हे असतं की, जवळची- आईवडील, भाऊ, मित्र अशी कुणी माणसंही या 'धैर्यगुणाचं' मोल जाणणारी नसतात. शांतपणे वर्षानुवर्षं कराव्या लागणाऱ्या कष्टांची जाणीव नसणारी असतात. ती वारंवार 'आता ते झालं का 'म्हणून किंवा अधिकच अपेक्षा बाळगून अधीरपणानं या करणाऱ्यालाही आणखीच अडचणीत टाकतात,निराश करतात. काही ठिकाणी तर सर्व मिळून गुरूला,शिकवणाऱ्याला,बाहेर प्रतिसाद न देणाऱ्या जाणकारांना दोष देऊन अकारण कलुषितता आणतात, पसरवतात.

अशा वेळी या साऱ्या नकारात्मक गोष्टींपासून स्वत:ला दूर ठेवायला किंवा प्रगतीच्या मार्गावर उलट स्थिरपणे, अढळपणे मार्गक्रमण करायला श्री रणछोडदासजींचं वचन नक्कीच उपयोगी ठरेल.

ते मूळ वचनात म्हणतात, 'बना धीरी धीरज रखो,धीरजसे सब

होय। माली सींचे बगीचा, ऋतु आए फल होय ।।' श्री महाराजांचं मूळ नाव बनादास असल्यानं स्वत:ची नाम मुद्रा देऊन ते स्वत:च्या मनाला उपदेश करण्याच्या निमित्तानं या दोह्यात सांगतात की, माळ्यानं बाग शिंपीत राहून आपलं 'बागकाम' करीत राहावं. उगाच रोज उठून फळांची वाट पाहाण्यात अर्थ नसतो. ज्या त्या फळाचा ऋतु आला म्हणजे ते ते फळ येतंच. जे फळांचं, तेच फुलांचं आणि तेच आपल्या ध्येयांचं. मग ती ध्येयं कुठलीही असोत.

गाणाऱ्यानं उत्तम, आवश्यक रियाजात निरंतर राहावं, जे तुमचं गाणं म्हणून आकाराला येणार आहे ते त्याचा काळ आला की आकाराला येतंच आणि असंच असावं. उगीच कुणासारखं बनण्याचा अपरिपक्वपणाही करू नये. तसं बनणं ठीक आहे, पण दुय्यम आहे. जर आपली धीरानं, सातत्यानं, योग्य मेहनत घ्यायची तयारी असेल तर खरं पहिल्या दर्जाचं गाणं एक दिवस आकाराला येईलच. त्याची काळजी कर्मांची फळं देणाऱ्या निसर्गव्यवस्थेला असतेच. या वचनानं चित्त शांत राहील. नकारात्मक भावही टळतील.

जे हे सारं प्रपंचात अनेक क्षेत्रांत, अनेक माणसांच्या बाबतीत घडताना दिसेल तेच परमार्थात परमेश्वरप्राप्तीच्या, आत्मदर्शनाच्या बाबतीत घडताना दिसेल. त्यातसुद्धा अनेक टप्प्यावरची मंडळी अशीच अनेक बाबतीत अधीर, उतावळी व अपरिपक्व दिसतील.

चांगलं, ईश्वरी भाव जागवणारं खरं भजन ऐकलं की त्यांना वाटतं, बस आपण असं भजन म्हणावं. एक दोनचार महिने गेले की वाटतं अजून आपल्याला लोक भजन म्हणायला का बोलवीत नाहीत ? उत्तम प्रवचन ऐकलं की वाटतं,असं यावं. जरा वर्ष दोन वर्षं पाचपन्नास ग्रंथ वाचतात मग वाटतं की, आता लोकांनी बोलवावं, आपण बोलावं

नि लोकांनी माना डोलवाव्या. एक दोन वर्षं काय दहापाच वर्षं गेली तरी तसं ईश्वरी प्रवचन काही यांच्या तोंडून येत नाही. कुणी काही तल्लीन होऊन जात नाही.

या तर परमार्थाच्या बाहेरच्या चौकातल्याच गोष्टी झाल्या. असल्या भजनप्रवचन येण्याशी खऱ्या भगवंतप्राप्तीचा काही संबंध नसतो. तो असतो तो साधन करणाऱ्यांच्या बाबतीत. त्याही ठिकाणी काही साधनं आहेत - कुठं दर्शनं, कुठं ध्यान, कुठं नाम, कुठं आणखी काही. जरा वर्ष दोनवर्षं साधन केलं की माणसाला वाटतं, आता काही अनुभव यावा, भगवंतानं दर्शन द्यावं, कृपेचे प्रत्यय यावेत.

दीक्षा किंवा अनुग्रह घेऊन आला आणि जरा कुठं नियमिततेनं साधन जमायला लागलं की वाटतं, की आता विकारांवर नियंत्रण यावं, मनाची एकाग्रता यावी आणि अशा अनेक गोष्टी. त्या तर काही घडत नाहीतच. मग गुरूवर, साधनावर, शेवटी ईश्वरावर अश्रद्धा होते, शंका येतात आणि आहे तेही रोपटं गायब होतं. अभाव धैर्याचाच असतो. येणाऱ्या नैराश्याला आपली अधीरताच कारणीभूत असते.

या वचनात खरं तर अजूनही काही बाबी आणि तत्त्वं आली आहेत. ती लक्षात घेतली गेली तर त्या वचनाचा अधिकच उपयोग करता येऊ शकेल. या वचनात हे लक्षात आणून दिलं गेलेलं आहे की, प्रत्येक गोष्ट फलित होण्याला लागणारा काळ वेगवेगळा आहे. तो चार महिन्यांत उगवणाऱ्या एखाद्या धान्यापासून अनेक दशकांनी लागणाऱ्या अक्रोडाच्या फळाप्रमाणं वेगवेगळा असू शकतो. प्रथम पाहावं की, आपण कुठली कुठली फळं-फुलं लावली, त्यानुसार तरी काळ लागेलच. म्हणजे असं की, लोकांचं रंजन करू शकणारं एखादं व्याख्यान तयार करणं आणि त्याचत्याच व्याख्यानाचे गावोगावी प्रयोग करण्याचं

ध्येय असेल तर लावलेलं झाड वेगळं आहे, बहुधा लवकर येणारं आहे. माणसाच्या अंतरंगाचा पालट घडवून आणणारं ईश्वरी प्रवचन होणं - करणं नव्हे - असेल तर झाड वेगळं आहे. त्याप्रमाणंच धीरानं काम करण्याची गरज आहे.

दुसरं तत्त्व हेही आहे की, माळी एखादं झाड लावतो, त्या वेळी पुढं त्याला फळ येईपर्यंतचे त्याचे कष्ट अपार, दीर्घकालीन असले तरी, अखेर ते सर्व कष्ट करूनही अमुक एक किंवा अमुक एका दर्जाचं फळ येण्यात - पडणाऱ्या हवेचा, मिळणाऱ्या प्रकाशाचा, वाहणाऱ्या वाऱ्याचा, न लागणाऱ्या किडीचा, आजूबाजूच्या झाडापेडांचा-निसर्गाचा पर्यायानं अंतिमत: भगवंताचा वाटाही असतो. आपलं काम आपण निरपेक्षतेनं, मन:पूर्वक करावं, उरलेल्या सर्वांचे हातभार लागणं त्यांच्यावर सोडावं. उत्तम आलेल्या फळातही त्या सर्वांचा वाटा ओळखून कृतज्ञ व आनंदी राहावं. हीच गोष्ट उत्तम शिष्य तयार होण्याच्या बाबतीत होऊ शकते.

तिसरं तत्त्व हे की, अनेकदा फळाच्या गडबडीमुळं अकारण ताण, अवाजवी कष्ट, चढत्यावाढत्या अपेक्षा, त्यासाठी अनेकदा अनैसर्गिक उपाय, अव्यवहार्य मार्ग माणूस चालण्याची शक्यता असते. ते मार्ग काहीवेळा फळांची लालूच दाखवणारे असले तरी स्वास्थ्याचे नसतात. मनुष्य या सुवचनाचं सतत स्मरण ठेवणारा असेल तर तो असले कष्ट कटाक्षानं टाळू शकेल.

असं हे सर्वत्र उपयोगी पडणारं सुवचन आपल्याला प्रपंचातही संस्मरणीय आहे आणि परमार्थातही !

*

१४.

तेचि भक्ती खरी ।
देव अंतरी बाहेरी ।।
- स्वामी निरंजन रघुनाथ

शब्द अर्थ पोचवण्याचं काम करतात. पण अनेकदा ते वापरून खूप गुळगुळीत होतात, खूप वापरून काही वेळा मूळ अर्थ गमावून बसतात. त्यांतलाच एक अत्यंत महत्त्वाचा शब्द घेऊन इथं स्वामी निरंजनांनी आपल्याला सावध केलेलं आहे. तो शब्द म्हणजे 'भक्ती'. भोळेभाबडेपणा - अंधश्रद्धेपासून ते भक्ती हेच खरं जीवनध्येय असण्यापर्यंत हा शब्द खूपदा, खूप ठिकाणी वापरला गेला आहे, जातो आहे. आता मूळ अर्थाचा थोडा विचार करण्याची गरज आली आहे. कठोर तपाचरणानं साक्षात श्री दत्तप्रभूंचं दर्शन घेणाऱ्या आणि प्रेमळ - प्रासादिक पदांसाठी विशेष प्रसिद्ध असणाऱ्या पूज्य स्वामी निरंजन रघुनाथांनी दीडशे वर्षांपूर्वीच्या या पदात आणि त्यांतल्या या सुवचनात भक्तीच्या मूळ अर्थाची स्पष्टता करताना म्हटलं आहे की,'अंतर्बाह्य देवत्व हीच खरी भक्ती होय.'

सध्या 'भक्ती' म्हटलं तरी देव,मूर्ती, देवळं, पूजा-अर्चा, हार-फुलं, माळा-उत्सव, प्रसाद-पंगती, यात्रा-प्रदक्षिणा अशा अनेक गोष्टी डोळ्यांसमोर सहज उभ्या राहातात. यावरून हा शब्द सध्या कोणत्या अर्थाचा बोध करतो, ते स्पष्ट होईल. या साऱ्या गोष्टी

करणारा माणूस 'भक्त किंवा भक्तिमान' म्हणून ओळखला जातो. तसे 'भक्त' होण्याच्या प्रयत्नातही अनेक लोक असतात. आपलं दर्शन चुकलं नाही, यात्रा-पुण्यतिथी-जयंती-कधी अंतरली नाही - हे कौतुकानं सांगणारे आणि आपल्या भक्तीची कृतकृत्यता बाळगणारेही असंख्य लोक भेटतात. या साऱ्या उपक्रमांत, त्यांच्या निष्ठेत, वर्षानुवर्षं ते त्यासाठी घेत असलेल्या कष्टांत काही दुमत नाही, हे खरंच आहे. प्रश्न आहे तो, हे भक्तीचं खरं स्वरूप आहे का किंवा भक्ती या शब्दानं एवढंच अभिप्रेत आहे का, हा आहे.

अडचण तिथंच आहे. दर्शन-देऊळ-यात्रा-उत्सव हे भक्तीचं स्वरूप नाही, असं नाही. या बाह्य कर्मांना महत्त्वही आहे. पण हे लक्षात घेण्यासारखं आहे की, ही कर्मं म्हणजे 'भक्ती' नव्हे. ती कर्मं कदाचित एखाद्या तासाची, वर्षातल्या काही दिवसांची असतात. मी चोवीस तास, बारा महिने, साठसत्तर वर्षं जगतो आहे. नुसता बाहेर नव्हे तर आत आणि बाहेर असं दोन्हीही मार्गांनी जगतो आहे. त्या जगण्याचा आणि भक्तीचा-उपक्रमांचा काही संबंध असणं आता विसरलं गेलं आहे, याकडं स्वामी लक्ष वेधीत आहेत. ही यात्रा-उत्सवांची भक्ती ही एखाद्या प्रापंचिक लग्नाकार्याच्या, सभासमारंभाच्या उत्साहाचीसुद्धा आवृत्ती असू शकते. भक्ताचं भक्तपण तेवढं असेलच, पण ते खरं त्या पलीकडं आहे. हे सुचवण्यासाठी स्वामी म्हणतात, 'तेचि भक्ती खरी'.

ती भक्ती खरी, जिच्यात माणसातला देव आत आणि बाहेर दोन्ही वर्तनांत, दोन्ही जगण्यात राहातो. या दृष्टीनं एकदा पाहायला लागलो की, लक्षात येतं की, भक्तीचं मर्म खरं कुठं आहे. माणूस वर्षातून गुरुपूर्णिमेला, पुण्यतिथीला जाऊन येईल आणि उरलेले दिवस साधं प्रापंचिक सुखलोलुप, स्वार्थी, विकारी जीवन जगेल.

बाहेर निर्लोभतेवर, ब्रह्मज्ञानावर उत्तम बोलेल अन् आत मानधनाच्या चिंतेत असेल, बाहेर समाजसेवेचं भक्तिकार्य करील आणि अंतरंगात मानमान्यता, पुरस्कारांची वाट पाहील, इतर समाजसेवकांबद्दल तुच्छता, अनादर ठेवील. बारा महिने गिऱ्हाइकाला नाडील, साठेबाज असेल, नोकरचाकराची पिळवणूक करील अन् वर्षातून एकदा देवस्थानला थोडी देणगी देऊन 'भक्त' ठरेल. असं असंख्य ठिकाणी, असंख्य व्यवहारांत घडताना दिसेल. मग देव 'अंतरी-बाहेरी' का म्हटलं ते लक्षात येईल.

वरून फूल वाहिलं तरी आतून मन वाहिलं तरच खरी भक्ती होईल. नाहीतर फूल वाहण्याची, नमस्कार करण्याची ती बाह्य क्रिया होईल. ती तर बाहेरून भक्ती दिसतेच आहे, पण अंतरी सारा दुष्काळ आहे. आत अपेक्षा, मागण्या, भल्याबुऱ्या विचारांची गर्दी, इतरांविषयीच्या असूया-मत्सर अशा असंख्य 'अभक्ती' दिसतील. मग बाहेरच्या भक्तीच्या क्रिया गरजेच्या असल्या तरी त्या आता भक्तीच्या नसून नुसत्या 'काही सात्त्विक वाटणाऱ्या क्रिया' उरतील. त्या अंतिमतः माणसाला देवमार्गावर पुढं नेणाऱ्या ठरणार नाहीत.

याच्याच उलट काही ठिकाणी असंही आढळेल की, अंतरंगात देवाची आठवण आहे, कुठं जप-विचार चालू आहेत, पण बाहेर कुठंही वर्तनात कुणाला फूलच काय पाकळीसुद्धा दिली जाणार नाही, दुसऱ्यांसाठी कुठली झीज नाही सोसली जाणार, कुणा भुकेल्याला-गरीबाला-गरजूला अन्नाचा घास नाही दिला जाणार, ना कुणा तहानलेल्याला पाणी. अंतरंगात विचार अगदी थोरथोर चालू आहेत. या आतल्या थोर विचारांना नुसतं मनोराज्यांचं स्वरूप आहे, हे लक्षात येईल.

नुसत्या चांगल्या चांगल्या भक्तिमान विचारांत आणि चिंतनांत

राहाणाऱ्यांनी स्वत:ला भले भक्त मानावं, पण ही नुसतीच 'अंतरी' भक्ती झाली. प्रत्यक्ष तशा, अनुरूप कृतींची, वर्तनाची जोड त्यांना नाही. ती भक्ती 'अंतरी'चे पोकळ मनोरे ठरतील. तेही पुढं जायला उपयोगी नाहीत. कारण आता भक्ती, देवत्व 'बाहेरी' नाही.

म्हणून स्वामी पुढं वर्णन करताना म्हणतात,'चराचर नरनारी दिसे जयालागी हरी' तो भक्त. 'जया देवभक्तपण । नाही द्वैताचे भाव।' तो भक्त. आतून एकपण, प्रेम, करुणा आहे आणि बाहेरही वर्तनात ती आहे - कुटुंबात, समाजात, सर्वत्र - तर तो भक्त. प्रेम झाडापेडावर आहे, दगडा-धोंड्यावर आहे आणि गुणीअवगुणी स्त्रीपुरुषांवरही आहे ती 'खरी भक्ती.'

या दृष्टीनं पाहू लागलो की, लक्षात येऊ लागतं की,'भक्ती'चा खरा अर्थ कसा पारखा होत गेला, हरवत गेला आहे. वास्तविक, अशी 'खरी भक्ती' किती गरजेची, किती विधायक, किती 'आचरणीय', किती 'आदरणीय' आहे ! कारण शेवटच्या ओळीत स्वामी म्हणतातच की,'बोले नित्य निरंजन। करा तयासी वंदन ।।' असा भक्त खरा भक्त, खरा वंदनीय. श्री महाराज म्हणत तसं लोक देवाला सोडतील, पण अशा खऱ्या भक्ताला भजतील आणि ते उचितच आहे.

आशा आहे 'भक्ती'चा आणि खऱ्या 'भक्ती'चा अर्थ आपल्याला आकळेल, आवडेल, आपल्याकडून आचरला जाईल. मग भक्तीचं साध्य असलेला आनंदाचा भगवंत दूर नाही !

*

१५.

गुरूंचा संतोष ही खरी पूजा
- श्री रामानंद बीडकर महाराज

पूजा हे तसं फार प्रचलित आणि पुरातन साधन आहे. सर्वसामान्य माणसालासुद्धा नुसती पूजाच नव्हे तर, पूजेतले उपचार, पूजेला लागणारी साधनं, पूजेचे विधी, त्यांचे क्रम, कुठल्या देवाला कुठल्या प्रकारची पूजा करावी - अशा तऱ्हेच्या गोष्टी सहजपणे माहीत असतात. इतकंच काय विशिष्ट देवांना आवडणारे विशिष्ट उपचार, विशिष्ट फुलं, पूजेचे तंत्रमंत्र हेही अनेकांना माहीत असतात. ही सर्वसामान्य पूजा असल्यामुळंच 'खरी पूजा' म्हणजे काय हे या वचनात श्री बीडकर महाराज सांगत आहेत.

आत्ता आपण आधी पाहिली ती पूजा विविध देवदेवतांच्या सगुणोपासनेतला एक प्रकार म्हणून प्रचलित पूजा आहे. तिला विशिष्ट अर्थ आणि तिचा विशिष्ट उपयोगही आहे. पण जी खरी पारमार्थिक प्रगती आहे, ती खूप मूलभूत आहे. साध्या पूजेनं, ती जर उत्तम तऱ्हेनं, शास्त्रानुसार, विविध विधींप्रमाणं केली तर चित्ताला प्रसन्न वाटतं, वातावरणालाही पवित्रता येते.

पण हा आपला अनुभव असेल की, ही प्रसन्नता, पवित्रता अगदी थोड्या काळापुरती आहे. ती एका दृष्टीनं महत्त्वाची उपयोगी, असली तरी ती फार टिकाऊ नाही. म्हणजे असं की, उत्तम पूजेनंतर प्रसन्न वाटत असतं खरं, पण त्याच वेळी समजा, क्षणभर कुणी

काही मनाविरुद्ध वागलं तर ही प्रसन्नता कितपत टिकेल ? चटकन नियंत्रण जाईल, राग येईल. म्हणून टिकाऊ बदलाचं महत्त्वही लक्षात येतं, तो कसा घडेल ही जिज्ञासाही उत्पन्न होते.

याच बरोबर आणखी एक गोष्टही या नेहमीच्या पूजेबद्दल लक्षात घेण्यासारखी आहे. ती बाह्यांगाची आहे. त्यामुळं तिला अनेक साधनं लागतात. साधी फुलंसुद्धा रंगीबेरंगी असली, विविध प्रकारची असली, सुवासिक असली, भरपूर असली की पूजा मोठी होते, चांगली दिसते.

हे स्वाभाविक असलं, असं करणं योग्य असलं तरी हे सारं करण्यासाठी लागणारी व्यावहारिक अनुकूलता, पैशाची सुबत्ता सर्वांकडं असेलच असंही नाही. म्हणून या पूजेनं मिळणाऱ्या लाभावर अर्थातच व्यावहारिक अनुकूलतेच्या मर्यादाही येतात. हा विचार लक्षात आला की, मग मात्र 'खरी पूजा' कोणती की जी सर्वांना शक्य आहे, गरजेची आहे, अधिक टिकाऊ आहे, हे समजून घेण्याची गरज निर्माण होईल.

या अर्थानं पाहिलं तर कुणाही गरीब, श्रीमंत, विद्वान, अडाणी अशा कुठल्याही माणसाला करता येण्यासारखी पूजा हीच खरी पूजा असली पाहिजे, हे लक्षात येतं. बाह्य परिस्थितीतली कुठलीही गोष्ट आपल्याला अनुकूल-प्रतिकूल कशीही असली तरी ती पूजा कुणालाही करता आली पाहिजे. अशी पूजा 'खरी' असून ती अंतरंगाशी निगडित आहे, याकडं श्री बीडकर महाराज आपलं लक्ष वेधीत आहेत.

नाहीतरी प्रगतीच्या आड खरं काय येत असेल तर ते 'अप्रगत' अंतरंगच होय. राग-लोभ-असूयेसारखे प्रसन्नता घालवणारे घटक दूर व्हायचे ते 'अंतरंगा'तच आणि ते दूर होऊन प्रसन्नता यायची तीही 'अंतरंगात'च नाही का ?

म्हणून खऱ्या गुरूंचा कटाक्ष नेहमी साधकाच्या, जिज्ञासूच्या,

शिष्याच्या अंतरंगावर असतो. एरवी गुरूंची साधी पूजा करणारा एखादा शिष्य आधी सांगितले तसे पाणी-गंध-फूल असे बाह्योपचार करून गुरूंची पूजा करू शकेल. त्याला स्वत:ला त्यामुळं क्षणिक समाधानही मिळेल. पण खऱ्या गुरूंच्या अंतरंगातला मात्र या पूजेनं खरा संतोष होण्यापेक्षा त्या शिष्यानं त्याच्या प्रगतीला आड येणारा, गुरूंनी दाखवून दिलेला एखादा अंतरंगातला दोष दूर केला, तर त्या पूजेनं संतोष होईल.

खऱ्या गुरूंचा संतोष हा शिष्यानं आपल्या अंतरंगविकासाच्या, अंतरंगदोष दूर करण्याच्या प्रयत्नानं केलेल्या पूजेवर अवलंबून असतो. त्यामुळंच गुरूंचा संतोष राखायचे प्रयत्न म्हणजेच शिष्याच्या अंतरंगातले त्याचे दोष त्याला दिसण्याचे आणि ते दूर करण्याचे प्रयत्न ठरतात. हीच पूजा खरी पूजा होते.

आता या पूजेनं होणाऱ्या बदलांचा क्षणभर विचार करू. अशा पूजेला बाह्य कुठल्या गोष्टीची गरज नसल्यानं ती कुणालाही करता येणं शक्य तर आहेच, पण या पूजेमुळं होणारा खरा आनंदही कायमचा टिकणारा आनंद आहे. त्यामुळं शिष्याच्या चित्ताला येणारी प्रसन्नता ही साध्या पूजेसारखी तात्कालिक नाही, कशावर अवलंबून नाही, ती टिकाऊ आहे. कारण आपल्याला कल्पना येत नाही, पण खरं पाहाता माणूस अप्रसन्न होतो, तो दु:खी होतो तो इतरांमुळं, परिस्थितीमुळं नाही, तर त्याच्या ठिकाणच्या राग-लोभ-अहंकार असल्या त्याच्या स्वत:च्या त्याज्य दोषांमुळंच.

गुरू नेमकं त्याच्यावरच बोट ठेवतात, त्याला ते सुधारायला सांगतात, संधी देतात, सुधारायला मदत करतात आणि शिष्यातल्या त्या सुधारणेनं शिष्याचीच प्रगती घडते, 'खरी' प्रगती होते. त्याच्या या खऱ्या प्रगतीमुळं गुरूंना संतोष होतो. म्हणून 'खऱ्या गुरूंना'सुद्धा वस्तू,

धनधान्य, मान देऊन ते प्रसन्न होत नाहीत, तर शिष्यातल्या अंतरंगाच्या खऱ्या सुधारणेनं, प्रगतीनं संतुष्ट होतात.

श्री लकुंडी महाराज नावाच्या एका सत्पुरुषांचे रंगराव आणि नारायणराव असे दोन शिष्य होते. रंगरावांच्या स्वभावात एका गुराप्पा नावाच्या तिथल्या गृहस्थांबद्दल द्वेष होता. म्हणून एके दिवशी लकुंडी महाराजांनी रंगरावांना बोलावून विचारलं की, 'मी एक काम सांगितलं तर कराल का ?' त्यावर रंगराव 'करीन' म्हणाले. महाराजांनी सांगितलं की, 'गुराप्पाकडून माधुकरी मागून आणावी.' त्यावर रंगराव म्हणाले, 'मी माधुकरी मागितली नाही, मागणार नाही आणि गुराप्पाकडून तर आणणं मला जमणार नाही.'

अर्थात गुरूंना स्वत:ला यात काहीच नको होतं. पण त्यानिमित्तानं रंगरावांच्या प्रगतीला आड येणारा अहंकार आणि द्वेष त्यांनी दाखवला होता. तो दूर करायची संधी दिली होती. ती रंगरावांनी घेतली असती तर त्यांचाच फायदा झाला असता. ती गोष्ट त्यांनी नाकारल्यानं थोड्या वेळानं नारायणरावांना ते सांगताच, त्यांनी ती गोष्ट केली. गुरूंचा संतोष साधला, स्वत:ची प्रगतीही साधली. पण रंगरावांनी हे न केल्यानं गुरूंचा संतोष साधायची एक चालून आलेली संधीही रंगरावांनी गमावली आणि खरी पूजाही.

म्हणून श्री बीडकर महाराज या अनमोल वचनात 'खऱ्या गुरूं'चीही ओळख देतात, 'खऱ्या पूजेचं रहस्य'ही सांगतात आणि 'खऱ्या शिष्या'च्या कर्तव्याचा बोधही देतात, हे प्रगती करू इच्छिणाऱ्या कुणालाही शिकण्यासारखं आहे.

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

नराचे नारायण होणारे संत म्हणजे या युगातले सार्वत्रिक व दृश्य चमत्कार होत. स्वतःसारखी देवत्वाची स्थिती इतर सामान्य माणसांना मिळावी म्हणून निरहंकार, निःस्वार्थी व निःस्पृह वृत्तीनं संत आपलं आयुष्य सर्वांसाठी वेचतात. संतांचा मार्ग शिकण्याचं एक सोपं साधन म्हणजे त्यांची अनमोल वचनं. संतवचनांतून मिळणारा बोध व्यक्तीला जागं करतो, प्रेरणा देतो, नवी दृष्टी देतो.

अशा निवडक संतवचनांचं निरूपण

संतबोध

या पुस्तकमालिकेतून

सादर होत आहे.

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।